दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.




बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -१४८ रविवार,दि.०२ फेब्रुवारी २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-148 | Saturday, Dt.02 February 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Pages 4

# आमदार सुरेश धस आणि बीड जिल्ह्याच्या राजकारणाची दिशाच बदलली !

## महाराष्ट्राचे मुख्यमंत्री धसांना शुभेच्छा देण्यासाठी आष्टीत येणार ?





बीड / वैभव स्वामी

आष्टी पाटोदा शिरूर कासार मतदार संघाचे भारतीय जनता पार्टीचे आमदार सुरेश धस यांनी मागील २ महिन्यापासून सुरू केलेल्या दणकेबाज आरोपांनी बीडसह संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. त्यांच्या या नव्या आक्रमक भूमिकेमुळे बीड जिल्ह्याच्या राजकारणाची दिशाच परळी वरून आष्टी कडे बदलली आहे. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात भारतीय जनता पार्टीच्या लोकनेत्या पंकजा गोपीनाथ मुंडे यांच्यासह मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील धनंजय मुंडे हे दोन मातब्बर नेते कॅबिनेट मंत्री असताना सुद्धा बीड जिल्ह्याला पालकत्व मिळाले नाही. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवारांना बीड जिल्ह्याचे पालकमंत्री व्हावे लागले. बीड सह राज्याच्या राजकारणाची दिशा सुरेश धस जाणीवपूर्वक बदलवत आहेत का ? त्यांच्या या भूमिके पाठीमागे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे खंबीरपणे उभे आहेत का ? असतील तर या मागचे नेमके काय राजकारण आहे ? याबद्दल तर्कवितर्क होत आहेत. त्यातच बीड जिल्ह्यातील राजकीय वातावरण कमालीचे तापलेले असताना अवघ्या दोन दिवसात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आष्टी मध्ये विकास कामांच्या उद्घाटना निमित्त येत आहेत. मात्र वास्तविक ते सुरेश धस यांनी स्वीकारलेल्या या नव्या भूमिकेबद्दल आणि त्यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करून शुभेच्छा देण्यासाठी येत आहेत का ? यावर जिल्हाभरात चर्चा सुरू झाली आहे.

शिवसेना भाजपा युतीचे सरकार असताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. त्यांच्या मंत्रिमंडळामध्ये पहिल्या पाच मंत्र्यांमध्ये बीड जिल्ह्याच्या लोकनेता पंकजाताई मुंडे होत्या. त्यांच्याकडे एक नव्हे तब्बल पाच तोलामोलाची खाती होती. त्यांना मंत्रिमंडळात विशेष स्थान होते. पंकजाताईंची लोकप्रियता मंत्री असताना दिवसेंदिवस वाढत होती. याच दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बीड जिल्ह्यामध्ये ज्या ज्या वेळी आले त्या त्यावेळी पंकजा मुंडे समर्थकांनी

। पान २ वर..

## बीड मतदारसंघातील पात्र कुटुंबांनी लाभ घेण्याचे आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन

# प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणसाठी नवीन उद्दीष्ट प्राप्त



बीड (प्रतिनिधी)

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) या योजनेसाठी नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले असून बीड तालुक्यासाठी तब्बल ५०१८ तर शिरूर कासार तालुक्यासाठी ३४९९ घरकुलांचे नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे बीड मतदारसंघातील निकषपात्र कुटुंबांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

स्वतःचे पक्के घर नसलेल्या कुटूंबांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घर बांधण्यासाठी अनुदान देण्यात येते. यावेळेस बीड मतदारसंघातील बीड व शिरूर कासार तालुक्यासाठी भरघोस उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे जास्तीत पात्र ठरलेल्या व यादीत नाव आलेल्या कुटुंबांनी आपले प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह ग्रामपंचायत मार्फत दाखल करून या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. तसेच घरकुल प्रक्रिया पारदर्शक व्हावी व नागरिकांना यासंदर्भात कसल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याबाबत काळजी घेण्याच्या सूचनाही आ.क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

आर्थिक मागणी झाल्यास संपर्क करा

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) या योजनेच्या कोणत्याही टप्प्यावर आर्थिक मागणी झाल्यास ९७६६२७२७२४, ९३७३६०३११९ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे.

# १०१ गावच्या पाणी पुरवठ्याच्या ७२ ठेकेदार काळ्या यादीत

## जि.प.सीईओ अदित्य जीवने यांचा ठेकेदारांना जोरदार दणका

बीड (प्रतिनिधी)

जिल्हयात सुरु असलेल्या जलजीवन मिशन अंतर्गत दिलेल्या कालावधीत कामे पूर्ण न करणाऱ्या १०१ कामांच्या ७२ ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्यात येणार असून तशी अंतिम कारणे दाखवा नोटीस मुख्य कार्यकारी अधिकारी अदित्य जीवने यांनी बजावली असून या मुळे ठेकेदारामध्ये खळबळ उडाली आहे. गेल्या आठवडयात जलजीवन मिशन अंतर्गत २२ गुत्तेदारावर सदर कारवाई करण्यात आली होती. जलजीवन मिशन अंतर्गत जिल्हयात विहित कालावधीत कामे पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. केंद्र शासनाचा कालबध्द कार्यक्रम तसेच मुख्यमंत्रयांच्या १०० दिवस कार्यक्रमातंर्गत तात्काळ विहित कालावधीत ही कामे पूर्ण

। पान २ वर..

# माजलगावात महिलेवर लैंगिक अत्याचार

## डॉ.बांडगेवर गुन्हा दाखल

जेलमध्ये रवानगी

माजलगाव (प्रतिनिधी)

येथील छत्रपती संभाजी चौक येथे टवाणी कॉम्प्लेक्समध्ये वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या करणाऱ्या डॉ.मोहन मधुकर बांडगे याने एका महिलेवर लैंगिक अत्याचार केला म्हणून माजलगाव शहर पोलीस स्टेशन येथे ३७६ चा गुन्हा दाखल झाला आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, माजलगाव शहरातील मंजरथ रोड या भागामध्ये राहणाऱ्या एका महिलेवर लैंगिक अत्याचार करणारा आयुर्वेदिक डॉक्टर म्हणून मिरवणाऱ्या डॉ.मोहन बांडगेला दि.२५/१/२०२५ रोजी माजलगाव शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला असून पीडित महिलेच्या तक्रारीवरून आरोपी मोहन बांडगेला दि.२९/१/२०२५ रोजी पिंक पथकाचे प्रमुख महेश भोसले यांनी त्यांच्या पथकासह अटक करून कोर्टासमोर हजर केले असता सुरुवातीला त्याला एक दिवसाची पोलीस कस्टडी देऊन पी.सी.आर.संपल्याच्या नंतर दि.३१ जानेवारी २०२५ रोजी माजलगाव न्यायालयात हजर केले असता त्या आरोपीस १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे.













संपादकीय

# यशाची पुढे आशा दिसे

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज सलग आठवा अर्थसंकल्प मांडत असताना त्यांनी शुक्रवारी संसदेला सादर केलेला आर्थिक पाहणी अहवाल बऱ्याच आशा निर्माण करणारा आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज सलग आठवा अर्थसंकल्प मांडत असताना त्यांनी शुक्रवारी संसदेला सादर केलेला आर्थिक पाहणी अहवाल बऱ्याच आशा निर्माण करणारा आहे. अर्थव्यवस्थेचा आकार जसजसा वाढत जातो; तसतसा दर वर्षी वाढीचा वेग कायम ठेवणे हे कठीण होत जाते. चीननेही हा अनुभव घेतला आहे.या पार्श्वभूमीवर अर्थमंत्र्यांनी व्यक्त केलेला ६.३ ते ६.८ टक्के वाढीचा दर हा फारसा कमी मानता येणार नाही. विशेषत: जगात अनेक देश आजही उणे विकासदराशी झुंजत आहेत. बरेचसे एक ते तीन टक्क्यांमध्ये अडकले आहेत. अशा वेळी दर वर्षी सहा टक्क्यांच्या वर विकास वाढीचा दर राखणारा भारत हा जगातला एकमेव मोठा देश आहे. याचा अर्थ, देशासमोरची आर्थिक आव्हाने संपली किंवा आटोक्यात आली, असे नाही. बेरोजगारीचे प्रचंड प्रमाण, वाढती आर्थिक विषमता, पायाभूत सुविधांचे वाढते; पण आजही अनेक ठिकाणी अपुरे असणारे जाळे आणि देशाच्या काही पुंजक्यांमधली भयंकर गरिबी... हे प्रश्न आजही पुरते सुटलेले नाहीत. मात्र, व्यापक अर्थाने भारतीय अर्थकारणाची वाटचाल दमदार होते आहे आणि या वाटचालीचे प्रतिबिंब अहवालात पडलेले दिसते.

सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाचे म्हणजे दर आठवड्याला साठ तासांच्या वर काम करणे आरोग्यासाठी चांगले नाही, असे अहवालात स्पष्टपणे म्हटले आहे. गेले काही दिवस या मुद्द्याची अत्यंत अशास्त्रीय व अमानवी चर्चा चालली होती. त्याचबरोबर, कृत्रिम प्रज्ञेचा अधिकाधिक वापर समाजहितासाठी करायला हवा, अशी भूमिका अहवालात मांडली आहे. त्यासाठी नवी नियमावली असावी, असेही म्हटले आहे. दूरसंचार क्रांतीचा पुढचा टप्पा गाठल्याने आता ७८३ जिल्ह्यांपैकी ७७९ जिल्ह्यांमध्ये आता ५–जी सेवा मिळते आहे. प्रशासनालाही याची मदत होत असली तरी नागरिकांना मिळणाऱ्या प्रत्यक्ष सेवांमध्ये या क्रांतीचा अनुभव अधिक यायला हवा. त्या दृष्टीने अर्थमंत्री काही पावले टाकतात का, हे आज समजेल.

भारतीय अर्थव्यवस्था वेगाने विस्तारत असली तरी उत्पादन क्षेत्रातील वाढ म्हणावी तितकी प्रभावी नव्हती. जगातील एकूण उत्पादनातील भारताची टक्केवारी २.८ पर्यंत गेली आहे, ही समाधानाची बाब आहे. मात्र, ज्या चीनशी स्पर्धा करण्याची उमेद बाळगली जाते, तिथे आजही जगातील तीस टक्के उत्पादन होते. ही तफावत प्रचंड आहे. घरबांधणी, वाहन उद्योग, सरकारी पुढाकाराने होणारी पायाभूत सुविधांची कामे ही उत्पादन क्षेत्राची खरी बलस्थाने असतात.

पोलाद, सिमेंट, वीज या सगळ्यांचे उत्पादन यांच्याशी निगडित आहे. या पार्श्वभूमीवर पीएम आवास योजनेत एक कोटी १८ लाख घरांच्या बांधणीला मान्यता असेल तर ती मोठीच उडी आहे. यातल्या ८९ लाख घरांचे बांधकाम पुरेही झाले आहे. देशातील सर्व शहरांमध्ये झोपडपट्टी निर्मूलन योजनांशी पीएम आवास योजना भक्कमपणे जोडल्याशिवाय शहरांचा तोंडवळा जसा बदलणार नाही; तसेच, या योजनेला खऱ्या अर्थाने व्यापक यश मिळणार नाही. या योजनेपेक्षाही रस्ते आणि रेल्वेमार्ग यांच्या बांधणीचा वेग अधिक समाधानकारक आहे. रेल्वेचे डबे व इंजिन यांच्या उत्पादनाचा वाढीव वेग अधिक चांगली सेवा देण्यास उपयुक्त ठरेल. रेल्वे अर्थसंकल्प मुख्य अर्थसंकल्पात विलीन झाल्याने रेल्वे खात्याचा लाभ झाल्याचे अनेक तज्ज्ञ सांगतात. हा लाभ प्रत्यक्ष प्रवाशांच्या पदरात नेमका कसा पडणार आहे, हे आज अर्थसंकल्पामधूनच समजेल.

# भारतीय संविधान पूजेचा नाही तर अंमल करण्याचा ग्रंथ आहे – बनसोडे पी.व्ही.

## महामानव सार्वजनिक वाचनालया तर्फे मूकनायक दिन संपन्न




बीड (प्रतिनिधी)

आपल्या देशात वर्ण व्यवस्थेने निर्माण केलेल्या समाज व्यवस्थेत धार्मिक,सांस्कृतिक, शैक्षणिक व आर्थिक गुलाम गिरीत पिचत पडलेल्या दीन दलित वंचित समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचारची वाचा फोडण्याकरता व त्यांचे दुःख काय आहे हे सर्वांना समजण्याकरता १०५ वर्षापूर्वी मूकनायक या पाक्षिकाचा प्रारंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला होता. तो दिन सध्याच्या प्रसार माध्यमांना मोलाचे मार्गदर्शक ठरला आहे. इंग्रजांच्या दीडशे वर्षांच्या गुलामगिरीतून मुक्त झालेल्या स्वतंत्र भारताकरता जगातील सर्वश्रेष्ठ संविधान त्यांनी निर्माण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विज्ञानवादी दृष्टिकोनाचे व प्रज्ञा, शील, मैत्री हे मानवा मानवातील विषमता नष्ट करण्याचे साधन म्हणजे भारतीय संविधान होय. या संविधानाचे सार म्हणजे संविधानाची प्रस्ताविका होय. भारतीय संविधान पूजेचा नाही तर अंमल करण्याचा ग्रंथ आहे असे उद्गार अध्यक्षपदी लाभलेले सेवानिवृत्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषदचे बनसोडे पी.व्ही.यांनी केले.

महामानव सार्वजनिक वाचनालयाने मूकनायक दिन समारंभ आयोजित केला होता. याकार्यक्रमास संपादक दैनिक समर्थ राजयोग तथा प्रदेश संपर्कप्रमुख महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे वैभव स्वामी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर बीड अक्षरधामचे संपादक बालाजी जगतकर, संपादक बालाजी तोंडे, दैनिक लोकमतचे प्रतिनिधी आकाश सावंत, संतोष राजपूत आणि सेवानिवृत्त पी.आय. यु. एस.पारवे, सेवा निवृत्ती इंजिनिअर भिमज्ञ वेडे यांची मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाला वाचनालयाचे अध्यक्ष कॅप्टन राजाभाऊ आठवले व सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक एल.आय.सी. यु. एस. वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते, महापुरुषांच्या प्रतिमेचे पुष्पहार व पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जी.एम.भोले यांनी करून महामानव सार्वजनिक वाचनालय, महामानव अभिवादन ग्रुप, वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालय राबवित असलेल्या समाज उपयोगी कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत वासनिक यांनी केले. प्रमुख पाहुणे संपादक वैभव स्वामी यांनी मनोगतामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेळची म्हणजेच १९२० च्या वेळची पत्रकारिता व सध्याच्या काळातील पत्रकारिता याबद्दल सखोल विवेचन केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेचा आदर्श पत्रकारिते मध्ये सर्वांच्या डोळ्यासमोर राहावा म्हणून ३१ जानेवारी हा मुकनायक दिन म्हणून संपूर्ण पत्रकार संघतुन, शाळा व महाविद्यालयातून, शासन स्तरावर संपन्न होणे गरजेचे आहे. त्याकरिता शासनाकडे पाठपुरावा केल्या जाईल व पुढील वर्षाचा मूकनायक दिन बीड जिल्हा पत्रकार संघाचा सहभाग नोंदवून व्यापक स्वरूपात संपन्न केला जाईल असे ठोस आश्वासन दिले. या प्रसंगी बालाजी जगतकर, बालाजी तोंडे, आकाश सावंत संतोष राजपूत, पी.आय. पारवे,ईजि. भिमज्ञ वेडे यांनी पत्रकारितेचे महत्व व सध्या परिस्थितीबद्दल सखोल विवेचन केले. या कार्यक्रमास सुजाता वासनिक, रेश्मा विद्यागर, राजू भोले, सोनवणे, रमेश माटे . माजी सैनिक पंडित चक्रे, पी.एस.आय. रामदेव शिनगारे, प्रा. अशोक गायकवाड,अँड.तेजस वडमारे, विद्यागर नाना, काशिनाथ वाघमारे, अर्जुन जवंजाळ व वाचनालयाचे, बहुसंख्य सदस्य, नागरिकांची उपस्थिती होती. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुदायिक वाचनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

दर्पण दिन प्रमाणे मूकनायक दिन सुद्धा शासकीय स्तरावर साजरा व्हावा – वैभव स्वामी पहिले मराठी वृत्तपत्र बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण या नावाने सुरू केले.तो दिवस म्हणजे ६ जानेवारी. हा दिवस शासकीय स्तरावर दर्पण दिन म्हणून दरवर्षी साजरा होतो. या देशातील उपेक्षित वंचित पीडित शोषित दलित अन्यायग्रस्त अशा वंचितांसाठी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी पहिले स्वतंत्र वृत्तपत्र मूकनायक या नावाने पाक्षिक सुरू केले. तो दिवस म्हणजे ३१ जानेवारी. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने यापुढे दर्पण दिन प्रमाणेच संपूर्ण महाराष्ट्रात शासकीय स्तरावर ३१ जानेवारी रोजी मूकनायक दिन साजरा करण्यासंदर्भात शासकीय निर्णय घ्यावा. यासाठी पत्रकार संघ संपूर्ण महाराष्ट्रात संघर्ष करेल आणि या मूकनायकाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करेल. अशी भूमिका मूकनायक दिनी पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी जाहीर केले. एवढेच नव्हे तर पत्रकार संघाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यभरातील पत्रकारांना मूकनायक दिन साजरा करण्याचे आवाहन केले. या अनुषंगाने राज्यातील अनेक जिल्हा तालुका शहर ठिकाणी पहिल्यांदाच मूकनायक दिन मोठ्या संख्येने साजरा झाला. एवढेच नव्हे तर बीडच्या जिल्हा माहिती कार्यालयात देखील पत्रकार संघाच्या पुढाकाराने मूकनायक दिन जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्रात पहिल्यांदाच शासकीय कार्यालयात साजरा करण्यात आला. या भूमिकेचे पत्रकारांमधून स्वागत होत आहे.

# पंतप्रधान घरकुल आवास योजना, मंजूर लाभार्थ्यांनी दोन दिवसात कागदपत्राची पूर्तता करावी

## गटविकास अधिकारी, सचिन सानप

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजना–ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत.. लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाले आहेत.गावनिहाय ग्रामपंचायत कार्यालया समोर मंजूर झालेल्या लाभार्थी यांच्या याद्या लावल्या असून लाभार्थ्यांनी ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे येत्या दोन दिवसांत आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता करून या योजनेचा लाभ घ्यावा ..आणि मार्च अखेपर्यंत घराचे बांधकाम पूर्ण करावे असे आवाहन आष्टी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी डॉ.सचिन सानप यांनी केले आहे याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की, आ.सुरेश धस अण्णा यांनी प्रयत्नपूर्वक आष्टी तालुक्यामध्ये अनेक गावातील लाभार्थ्यांसाठी पंतप्रधान घरकुल योजना–ग्रामीण टप्पा –२ अंतर्गत घरकुल मंजुरी व पहिला हप्ता वितरणाचे काम हाती घेतले आहे.. प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुले मंजूर झाले असून मंजूर लाभार्थ्यांच्या मतदारसंघातील गावनिहाय यादी ग्रामपंचायत कार्यालयासमोर लावण्यात आली आहे.यामध्ये आष्टी तालुक्यात ६१५७ घरकुले मंजूर झाले असून यादीतील लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे. यासाठी १) ग्रामपंचायतचा जागा उपलब्धेप्रमाणे पीटीआर किंवा सातबारा,२) आधार बँक पासबुक या आवश्यक कागदपत्राची पूर्तता संबंधित गावातील ग्रामसेवक किंवा ग्रामीण



गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे येत्या दोन दिवसात करावी. पुढच्या आठवड्या पर्यंत लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये पहिल्या हप्त्याचे अनुदान जमा केले जाणार आहे. घरकुल यादीत दिलेल्या लाभार्थ्यांनी नियमाप्रमाणे कागदपत्रे दोन दिवसात जमा करावेत म्हणजे ऑनलाइन प्रणाली मार्फत घरकुल मंजुरी व लाभार्थ्यांच्या खात्यात घरकुलाचा पहिला हप्ता जमा होणार असून या घरकुलांचे बांधकाम मार्च २०२५ अखेर पूर्ण करावे याबाबत माननीय आमदार सुरेश धस अण्णा यांनी याबाबत बैठकीमध्ये निर्देश दिलेले आहेत त्यानुसार सर्व लाभार्थ्यांनी दोन दिवसात कागदपत्र जमा करून पहिला हप्ता पदरात पडून घ्यावा आणि बांधकाम सुरू करून उर्वरित अनुदान प्राप्त करून घ्यावे आणि ३१ मार्च २० २५

# यंदाचा सद्भावना पुरस्कार राजकुमार खिंवसरा यांना आज देणार

**बीड (प्रतिनिधी)**

**सद्भावना मित्रपरिवाराच्या वतीने दिला जाणारा स्वर्गीय राधेश्यामजी मुंदडा स्मृती सद्भावना पुरस्कार यावर्षी छत्रपती संभाजीनगर येथील उद्योजक तथा समाजसेवक राजकुमार खिंवसरा यांना आज रविवारी देण्यात येणार आहे.** राजकुमार खिंवसरा गेली पंधरा वर्षे डॉ. हेडगेवार रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांना मोफत अन्नदान करतात, याबरोबरच त्यांनी रक्तदानाची मोठी मोहीम मागील पंचवीस वर्षापासून चालवलेली आहे. मूळ बीडचे भूमिपुत्र असलेले राजकुमार खिंवसरा हे संभाजीनगर आणि परिसरात जेष्ठ नागरिकांची सेवा करण्याच्या माध्यमातून सद्भावना निर्माण करतात म्हणून त्यांना यंदाचा सद्भावना पुरस्कार रविवार दिनांक २ फेब्रुवारी रोजी हॉटेल अन्विताच्या दरबार हॉलमध्ये मुंबई येथील प्रख्यात उद्योजक समाजसेवक, समस्त महाजन ट्रस्ट मुंबईचे प्रमुख गिरीशभाई शाह यांच्या हस्ते देण्यात येणार आहे या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सद्भावना मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय (देवा) नलावडे यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त पेठ बीड समितीच्या वतीने सपत्नीक सत्कार संपन्न

**बीड (प्रतिनिधी)**

**पेठ बीड भागातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा मार्गदर्शक श्री दत्तात्रय (देवा) नलावडे यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त बालाजी मंदिर सभागृहात शनिवारी अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.**





याप्रसंगी पेठ बीड शहर कृति विकास समितीचे संस्थापक तथा माजी उपनगराध्यक्ष श्री अमृत काका सारडा, जयंत राऊत, विलास बामणे, जगन्नाथ शिंदे, बाबुराव परळकर, सुरेश साळुंके, मुकेश शिवगण, कल्याण रायते, श्याम भागवत, लाला बनसोडे , प्रभाकर शिंदे, राम इगडे, धनंजय गोस्वामी आदींच्या हस्ते दत्तात्रय देवा यांचा सत्कार करण्यात आला तसेच पुढील आयुष्यासाठी आनंद, आरोग्यमय शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

# चोरीस गेलेले मोबाईल फोन बीड पोलिसांनी मिळून दिले परत

बीड (प्रतिनिधी)

दोन दिवसांपूर्वी जिजामाता चौक येथे भाजीपाला विकणाऱ्या महिला उर्मिला गणेश काशीद राहणार जिजामाता चौक, बीड यांचा मोबाईल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेला होता.तसेच निलेश फुलचंद तिडके राहणार धानोरा रोड बीड. यांचा मोबाईल रिक्षात विसरून राहिला होता परंतु रिक्षावालाने तो लबाडीने चोरून ठेवला होता.या दोन्ही मोबाईलचा तपास बीड शहराच्या डीबी पथकाने वेगाने करून ४८ तासाच्या आत दोन्हीही मोबाईल परत मिळून दिले.



दोन्ही मोबाईल महागडे होते आणि ते मोबाईल परत मिळाल्यानंतर यातील पीडित यांनी समाधान व्यक्त केले आहे.सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक श्री नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विश्वंभर गोलडे यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड, पोलिस अंमलदार बाळासाहेब शिरसाट, जयसिंग वायकर, मनोज परजणे, अश्फाक सय्यद यांनी केली आहे.

## पान १ वरून...

**आमदार सुरेश धस...**

त्यांच्या समक्ष कोण आली रे कोण आली महाराष्ट्राची वाघीण आली... जनतेच्या मनातील मुख्यमंत्री आली... अशा घोषणांनी सातत्याने परिसर दणाणून सोडला. मुंडे समर्थकांची ही आक्रमकता पाहून चाणाक्ष आणि धुर्त असलेले देवेंद्र फडणवीस अस्वस्थ होत होते. मात्र त्यांनी त्यांची अस्वस्थता कधी दिसू दिली नाही.मात्र तेव्हापासून ते पंकजा मुंडे यांच्यापासून दूर होत गेले आणि त्यांच्यामध्ये मोठी राजकीय दरी निर्माण झाली होती. तो राग तो द्वेष त्यांच्या मनात नक्कीच होता. पण त्यांनी तो कधी प्रगट होऊ दिला नाही.कालांतराने महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती बदलली महाराष्ट्रात शिवसेनेचे उद्धव ठाकरे यांनी भाजपासोबत असलेली युती तोडून महाविकास आघाडीला जवळ केले. आणि महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आले. या सरकार स्थापनेमध्ये त्यावेळी धनंजय मुंडे यांनी कमालीची राजकीय खेळी खेळली होती.त्यामुळे देवेंद्र फडणवीस अधिकच अस्वस्थ झाले. त्यांनी त्यावेळी अजितदादा पवार हा मोठा मासा गळाला लावला. हा राजकीय डाव टाकत असताना अजित पवारांचे निकटवर्तीय धनंजय मुंडे यांच्या खांद्यावर बंदूक होती.ठरल्याप्रमाणे पहाटेचा शपथविधी उरकून घेण्यात आला. मात्र पुढे अजित दादांना आणि धनंजय मुंडे यांना आपल्या सोबत आलेल्या आमदारांना आपल्या पाठीशी ठेवण्यात यश आले नाही. त्यांच्यासोबत आलेले आमदार पुन्हा पवार साहेबाकडे गेले. त्यामुळे सरकार स्थापन होणार नाही आपले हसू होईल. हे लक्षात आल्यामुळे देवेंद्र फडणवीस यांनी अविश्वास ठरावाला सामोरे न जाता मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. मात्र यामुळे देवेंद्र फडणवीस यांची महाराष्ट्रापासून ते दिल्लीपर्यंत मोठी राजकीय नाचक्की केवळ धनंजय मुंडे यांनी खंबीरपणे दिलेली साथ निभावली नाही म्हणून ओढावली गेली. याबद्दल देवेंद्र फडणवीस यांच्या मनात कदाचित पंकजा मुंडे एवढाच राग आणि द्वेष धनंजय मुंडे यांच्या बद्दल निर्माण झाला असावा. पुढे राजकारण बदलले ठाकरेंची शिवसेनाच फडणवीस यांनी उभी फोडणी आणि शिंदे शिवसेनेला सोबत घेऊन सरकार स्थापन केले. स्पष्ट बहुमत असताना सुद्धा त्यांनी पुन्हा एकदा महाराष्ट्रात राजकीय भूकंप घडवत शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस फोडली. पुन्हा एकदा धनंजय मुंडे यांनी अर्जुनाप्रमाणे भूमिका बजावत अजित पवारांना सत्तेत महायुतीमध्ये सामील केले. या राजकीय समीकरणांमध्ये धनंजय मुंडे यांनी प्रमुख भूमिका बजावलेली होती. आणि मागे जी चूक झाली होती ती सुधारली होती. सरकार व्यवस्थित चालले होते.पुन्हा महाराष्ट्रात विधानसभाच्या निवडणुका लागल्या. या निवडणुकांमधून जनतेने पुन्हा एकदा भाजपा आणि फुटीर शिंदे शिवसेने सह फुटीर अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला स्वीकारून बहुमताने आमदार निवडून दिले.संख्याबळ बहुमतात आल्याने महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत आले. अपेक्षेप्रमाणे देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाच्या खुर्चीवर विराजमान झाले. महायुतीच्या सरकारमध्ये नाविलाजास्तव फडणवीस यांना पंकजा मुंडे यांना कॅबिनेट मंत्री करावे लागले. दुसरीकडे अजित पवारांचे अत्यंत विश्वासू म्हणून धनंजय मुंडे यांना देखील कॅबिनेट मंत्री म्हणून संधी द्यावी लागली.

दुर्दैवाने बीड जिल्ह्यातील मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. ज्या खंडणीवरून हा राडा झाला. त्या गुन्ह्यामध्ये धनंजय मुंडे यांचे अतिशय निकटवर्तीय वाल्मीक अण्णा कराड यांच्यावर गुन्हा दाखल झाला. ज्यावेळी धनंजय मुंडे पालकमंत्री होते त्यावेळी त्यांनी बीड विधानसभेचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी आपल्या सोबत बंडखोरी केली. ते शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये राहिले त्याचा राग मनात धरून त्यांनी संदीप क्षीरसागर यांना सत्तेचा वाटा अपेक्षेप्रमाणे दिला नाही. उलट त्यांच्या मागे अनेक ससेमीरे लावले. एवढेच नव्हे तर संदीप क्षीरसागर यांच्या विरोधात त्यांच्याच बंधूला डॉक्टर योगेश क्षीरसागरला बीड विधानसभेचे उमेदवारी देऊन अडचणीत आणले. तरी देखील संदीप क्षीरसागर यांना आमदार होण्याची मोठी संधी मिळाली. मागील सत्तेच्या कार्यकाळात तत्कालीन पालकमंत्री धनंजय मुंडे आणि त्यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराड यांच्याकडून झालेला त्रास

## पान १ वरून...

असहय वेदना देणार होता ,की सल आणि त्यांनी वाल्मीक कराड यांच्यासह मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर हल्लाबोल चढवला. पेटलेले वातावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आले आणि त्यांनी अचानक पडद्यामागून ट्रिस्ट निर्माण केला. अशी चर्चा होत आहे चर्चेतून असे पुढे येत आहे की सत्ताधारी पक्षातील भाजपाचे बीड जिल्ह्यातील आमदार सुरेश धस यांना देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात लक्ष घालून धनंजय मुंडे यांचा खरा चेहरा जनतेसमोर आणण्यासाठी रान मोकळे केले. त्यामुळे सुरेश धस सुसाट वेगाने आरोप करत सुटले. त्याचे कारणही असे होते,आष्टी विधानसभा निवडणुकीत ते भारतीय जनता पक्षाचे उमेदवार असतानाही त्यांना पाडण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या नेत्या पंकजा मुंडे आणि त्यांच्या कट्टर समर्थकांनी उघड आणि सोप्या पद्धतीने प्रयत्न केला असा थेट आरोप निवडून येताच जाहीर सभेत सुरेश धस यांनी केला होता. पंकू ताई तुम्ही हे बरं केलं नाही.. असं जाहीर वक्तव्य करून त्याच वेळी आपली नाराजी व्यक्त केली होती एवढेच नव्हे तर धनंजय मुंडे पालकमंत्री असताना यांनी आष्टी मतदार संघाला डावलले आणि विधानसभा निवडणुकीत देखील अपेक्षित साथ दिली नाही. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे यांना उमेदवारी देऊन धस यांना अडचणीत आणल्याचा राग धस यांच्या मनामध्ये ठसलेला होता. त्यातच सीनियर असतानाही मंत्रिपद न मिळाल्यामुळे ते कमालीचे नाराज होते. अब नही तो फिर नही हे लक्षात घेऊन त्यांनी मुंडे बंधू भगिनीवर हल्लाबोल चढवला. अतिशय खालच्या टोकावर जाऊ त्यांनी भ्रष्टाचाराचे वाभाडे काढले. चारित्र्यावर शिंतोडे उडवणे गुंडागिरी बाहेर काढली काहीही बाहेर काढायचं शिल्लक ठेवलं नाही.एवढेच नव्हे तर जातीयवाद देखील समोर आणला. त्यामुळे बीड जिल्ह्यातील सामाजिक सलोखा बिघडला आणि राजकीय वातावरण दूषित झाले. हे खरे असले तरी देखील या प्रकरणात आमदार संदीप क्षीरसागर बाजूला राहिले आणि आष्टी विधानसभेचे उमेदवार आमदार सुरेश धस अख्ख्या महाराष्ट्रामध्ये चर्चेत आले. सुरेश धस यांच्या आक्रमकते पुढे मराठा आरक्षणाचा प्रश्न आणि मराठा आरक्षण योद्धा यांना देखील क्लीन चीट देण्यामध्ये फडणवीस यांचा डाव एक प्रकारे यशस्वी झाला असे म्हणावे लागेल एवढं सगळं सुरेश धस यांनी अंगावर घेऊन केल्यामुळे त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना येणे अपेक्षित होते त्यातच आमदार सुरेश धस यांचा आज दोन फेब्रुवारी रोजी वाढदिवस असल्याने संपूर्ण मतदारसंघात जिल्ह्यात मोठ्या जल्लोषात वाढदिवस साजरा करण्यात येत आहे. आता हा वाढदिवस तब्बल पंधरा दिवस चालेल बीड जिल्ह्यातील राजकीय वातावरण अतिशय संवेदनशील झालेले असताना आणि हे संवेदनशील होण्यामागे सुरेश धस यांची भूमिका प्रमुख असल्याने त्यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याला जाहीररीत्या येणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शक्य नसल्यामुळे ते चार किंवा पाच फेब्रुवारी रोजी आष्टी मधील विविध विकास कामांच्या उद्घाटनानिमित्त येणार असल्याचे अधिकृतरित्या समजते शासकीय विकास कामांच्या उद्घाटनाचे निमित्त असले तरी खऱ्या अर्थाने सुरेश धस यांनी एका दगडात दोन्ही मुंडेंना गार करून मुंडे यांनी जे यशस्वी राजकारण खेळले त्याबद्दल दस्तूर खुद्द मुख्यमंत्री आष्टी देऊन सुरेश धस यांना अभिष्टचिंतन करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यासाठी आले.तर बीड जिल्ह्याला नवल वाटायला नको सुरेश धस यांनी आष्टी मतदार संघाचा विकास व्हावा हे गृहीत धरून मुंडे पालकमंत्री नको ही भूमिका प्रामाणिकपणे बजावली आणि बीड जिल्ह्याच्या राजकारणात आणि प्रशासनात आता आपली जरब निर्माण केली आहे. अशा सातत्याने आगळावेगळा आक्रमक भूमिका घेऊन कायम चर्चेत राहणाऱ्या आणि सामान्य जनतेच्या हाकेला धावून येणाऱ्या सुरेश धस या नेतृत्वाला वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन आणि पुढील यशस्वी राजकीय खेळेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

**१०१ गावच्या पाणी ...**

करण्याच्या दृष्टीने कारवाई करण्यात आली आहे. नोटीस बजावण्यात आलेले पुढील प्रमाणे ठेकेदार आहेत.

## पान १ वरून...

चिचोंटी, लोनवळ व बावी तालुका वडवणी एम.टी.फड, खडकी व खंडोबाचीवाडी ता. वडवणी मे.तेजेस इलेक्ट्रीकल्स ण्ड सफायर्स हिवरा (गोवर्धन) ता.परळी एस.पी.कन्ट्रक्शन, आड हिंगणी ता.धारुर तुषार साहेबराव बडे, देवदहिफळ ता.धारुर मे.आर.जी. सानप कन्ट्रक्शन, खोडास ता.धारुर मे.कृष्णाई कन्ट्रक्शन, हिंगणी (खु) ता.धारुर संतोष शामराव पडुळे, नांदूर घाट ता.केज विशाल वैजीनाथ तांदळे, तांबवा ता.केज एम.टी.फड ,आवसगाव, धर्माळा,नरनळी, कानडी माळी,चंदन सावरगाव, बनकरंजा, उंदरी ता.केज ७ गावासाठी गुत्तेदार संतोष शामराव पडुळे, चिंचोळी माळी ता.केज तुपे अनंत भाऊसाहेब, कोटी ता.केज सुजित डोंगरे, कासारी ता.केज विजय कन्ट्रक्शन, गडल्याचीवाडी ता.केज स्वप्नील संजय चौरे, बोरी सावरगाव ता.केज महेश चंदनशिव, वाघेबाभुळगाव ता.केज शशिकांत रंगनाथ कोटुळे, सारणी सांगवी ता.केज विजय कन्ट्रक्शन, नागझरी ता.केज विजय कन्ट्रक्शन, सांगवी सारणी ता.केज प्रेमकुमार बापुराव दराडे, सारुळ ता.केज अश्विनी कन्ट्रक्शन , शिरपूर ता.केज वरिष्ठ बाबूराव घुले, येल्डा ता.अंबाजोगाई योगेश शामराव चव्हाण, हिवरा खुर्द ता.अंबाजोगाई विजय कन्ट्रक्शन, दत्तपूर ता.अंबाजोगाई सुरज नरसिंग गित्ते, अंबलवाडी ता.अंबाजोगाई सांगळे शशिकांत चंद्रकांत, मुळेगाव ता.अंबाजोगाई निलेश शिवाजीराव मुंडे, अकोला व तडोळा ता.अंबाजोगाई, शशिकांत रंगनाथ कोटुळे, माकेगाव ता.अंबाजोगई मे.आरोही सोल्युशन्स, बाळेवाडी (पि) ता.आष्टी घोडके नामदेव मुरलीधर, देवीनिमगाव ता.आष्टी मे.आरोही सोल्युशन्स, खुंटेफळ पुंडी ता.आष्टी, मुर्शदपूर ता.आष्टी, अंबोरा ता.आष्टी तिन्ही ही गावे मे.आरोही सोल्युशन्स,बीडसांगवी ता.आष्टी मे.साबीर कन्ट्रक्शन, बिरंगळवाडी ता.आष्टी मे.अजिंक्य भाऊसाहेब गवसने, जळगाव ता.आष्टी दैठणा ता.आष्टी एम.टी.फड, कारखेल (बु) ता.आष्टी मे.गर्जे राहूल खुशालराव, राळेसांगवी ता.आष्टी मे. पोपट सखाराम आबदार, पिंपळसुटी ता.आष्टी मे. पोपट सखाराम आबदार, गोदावरी तांडा ता.माजलगाव स्वप्नील सुर्यकांत धुमाळ, डुब्बाथडी ता.माजलगाव मे.भागवत सुभाष शिंदे, गुंजथडी ता.माजलगाव मे.शिंदे भारत रतनराव, शिमरी पाल ता.माजलगाव मे.प्रगती कन्ट्रक्शन, लवून नं.२ ता.माजलगाव मे.अन्सारी तारेक नासीर, शिंदखेड ता.गेवराई व कुंबेजळगाव ता.गेवराई मे.एन.डी.कन्ट्रक्शन, शिंपेगाव ता.गेवराई आबासाहेब अशोक जाधव, रुई ता.गेवराई भागवत सुभाष शिंदे, रानमळा ता.गेवराई राजकुमार गंगाधर घुमरे, महारटाकळी ता.गेवराई महादेव तुकाराम फड, जातेगाव ता.गेवराई राहुल रावसाहेब टेकाळे, काजळयाचीवाडी ता.गेवराई धनंजय नामदेव मुंडे, गोपतपिंपळगाव ता.गेवराई व माळहिवरा ता.गेवराई मे.प्रगती कन्ट्रक्शन धानोरा ता.गेवराई दादासाहेब बाबूराव खेडकर , बोरगाव (बु) व रामनगर ता.गेवराई जगदंबा कन्ट्रक्शन, झापेवाडी ता.शिरुर (का) विजय कन्ट्रक्शन, उंबरमुळी ता.शिरुर (का) अमोल वसंतराव जायभाये, पिंपळनेर ता.शिरुर (का) उदय कन्ट्रक्शन, पाडळी ता.शिरुर (का) विवेक निवृत्ती पाखरे, मातोरी ता.शिरुर (का) मे.आरोही सोलुशन्स, लिंबा ता.शिरुर (का) विशाल वैजीनाथ तांदळे, भडखेल ता.शिरुर (का) संग्राम छगनराव बांगर, ब्रम्हनाथ येळंब ता.शिरुर (का) मंगेश मधुकरराव सानप, खोकरमोहा ता.शिरुर (का) बी.व्ही.चव्हाण, निरगुडी, सुप्पा,धनगर जवळका, मांडवेवाडी, नागेशवाडी, वाघाचावाडा ता.पाटोदा विजय कन्ट्रक्शन, पिंपळवाडी ता.पाटोदा मे.आरोही सोलुशन्स, बेडुकवाडी ता.पाटोदा तांदळे संकेत रामहरी, भायाळा ता.पाटोदा मे.साबीर कन्ट्रक्शन, भुरेवाडी ता.पाटोदा विजय कन्ट्रक्शन, महेंद्रवाडी ता.पाटोदा राणी शिवाजी जाधव, मंझेरी घाट ता.पाटोदा पांडूरंग विक्रम नेमाने, रोहतवाडी ता.पाटोदा जगदंबा कन्ट्रक्शन, आहेर वाडगाव ता.बीड उदय कन्ट्रक्शन, कर्झनी ता.बीड अक्षय सुदामराव शिंदे परभणी (के) ता.बीड अक्षय सुदामराव शिंदे, पालसिंगन ता.बीड अनिकेत बापूराव चव्हाण, पिंपळवाडी ता.बीड शशिकांत रंगराव कोटुळे, मौजवाडी ता.बीड एस.पी.कन्ट्रक्शन, अवलपूर सोनगाव,पारगाव सिरस,हिवरापहाडी ता.बीड एस.पी.कन्ट्रक्शन, सात्रा–चांदणी व निवडूंगवाडी ता.बीड चव्हाण शिवाजी पांडूरंग, सावरगाव घाट ता.बीड एम.टी.फड, दहिफळ ता.बीड एम.टी.फड या प्रमाणे १०१ गावाच्या पाणी पुरवठा योजनेच्या कामास विलंब केल्याप्रकरणी ७२ ठेकेदारांना काळया यादीत टाकण्यात येणार आहे.

# जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लोकनेता - आ.सुरेश धस

पाटोदा - आ.सुरेश आण्णा धस यांनी मतदारसंघाचा विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे आ . सुरेश धस यांना जनमानसात एक वेगळेच स्थान प्राप्त झालेले आहे. त्यामुळे जनता त्यांना अदराने आण्णा म्हणतत. राजकारणात सर्वसामान्य कुटुंबातून उदयास आलेले राजकीय नेतृत्व म्हणजे माजी राज्यमंत्री सुरेश धस सरपंच ते महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री हा त्यांचा राजकीय प्रवास त्यांना भेटण्यासाठी कोणत्याही मध्यस्थाची गरज लागत नाही. हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.जनतेशी आदराने आपलेपणाने वागण्याची भावना हेच त्यांच्या लोकप्रियतेचे गमक आहे.

सर्वसामान्य कार्यकर्तेच्या गळ्यात हात टाकून बोलणे, एखाद्याची ओळख झाल्यावर त्याची ओळख कायम ठेवणे. एकादयाला आडचण आली तर त्याच्या अडचणीच्या काळात तत्काळ मदतीला धावून जाणे. या गुणांमुळे आ.सुरेश आण्णा धस यांच्या संपर्कात येणारा माणूस त्यांचाच होऊन जातो. मतदारसंघातील लोकांच्या सुखदुःखात सहभागी होण्याचा स्वभाव व सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्षाची भूमिका यामुळे त्यांची लोकप्रियता जे का रंजले गांजले , त्यासि म्हणे जो आपले तोची साथ ओळखाया देव तेथे चि जाणावा संत तुकाराम यांच्या अभंगा प्रमाणे कार्य करणारा नेता आ.सुरेश धस.

कोरोना काळात सर्व व्हीआयपी मंत्री घरात बसले होते. एकटे आ . सुरेश धस गुन्हे दाखल झाले तरी गोरगरीबासाठी गावोगावी फिरून कोरोना विषयी जनजागृती करून आधार देत होते. महाराष्ट्र राज्यात सर्वात जास्त कोविड सेंटर उघडणारा नेता आ . सुरेश धस.ऊसतोड मजुर याच्या प्रशासाठी लढणार नेतृत्व सर्वसामन्य कार्यकर्ता जीव लावणार नेतृत्व सर्व सामन्य कुटूंबातून पुढे आलेल्या माजी महसूल राज्यमंत्री आ.सुरेश धस यांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर आष्टी पाटोदा शिरुर मतदारसंघाचे नाव देशपातळीवर नेले. दुष्काळी भागाचा लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना त्यांनी या मतदारसंघाला ऐक नवीन ओळख निर्मान करण्यासाठी आहोरात्र प्रयत्न केला व सध्या पण करत आहेत. आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघात नगरपंचायत




अंतर्गत गोरगरीब जनतेला घरकुल योजनेचा लाभ दिला आहे . सतत विकासाचा ध्यास मनी घेऊन ते कार्यरत आहेत. त्यांनी मतदारसंघात अनेक विकास योजना खेचून आणल्या. सर्वसामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून त्यांनी जनाधार व्यापक वाढला आहे. संघटन कौशल्य अभ्यासूपणा दूरदृष्टी व सर्वसामान्यांमध्ये मिसळण्याची कला यामुळे आ.सुरेश धस अल्पावधीतच लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचले. भाजपकडून आमदारकीचे तिकीट मिळाल्यावर सन १९९९ मध्ये आ. सुरेश आण्णा धस यांचा फॉर्म भरण्यासाठी उसळलेली अभूतपूर्व गर्दी समर्थकांनी त्यावेळी डोक्यावर घेऊन आ.सुरेश धस यांची मिरवणूक काढली होती.आमदार झाल्यावर मी एक सालकरी अशी भूमीका यांनी मतदारसंघाचा गाडा हाकत असताना त्यांच्यातील नेतृत्वगुणांची चुणूक थेट काम करण्याची अफाट क्षमता लगेचच राज्यातील वरीष्ठ नेत्यांच्या नजरेस दिसली.त्यामुळेच आ.सुरेश आण्णा धस यांना राज्यमंत्रीपद दिले. सन २००३ च्या दुष्काळात सुमारे साठ हजार जनावरांची छावणी चालवून आ.धस यांनी राज्याचे लक्ष वेधून घेतले.रात्री छावणीत मुकाम करणारा आमदार ही लोकसेवकाची भूमिका आ.धस यानी जबाबदारीने पार पाडली . राज्यपातळीवरील विविध पदांवर काम करताना आ.धस यांनी जनतेप्रती आपली बांधिलकी कायम ठेवली. राज्यमंत्रीपद मिळाल्यानंतरही त्यात फरक पडला नाही . खेड्यातला शेतकरी , शेतमजूर अथवा कोणताही सामान्य माणूस थेट भेटून आ सुरेश धस यांच्यासमोर आपली समस्या मांडू शकतो. मंत्रिपद मिळाल्यावर त्यांनी जनतेच्या प्रश्नासाठी मंत्रालय आपल्या दारी ही अभिनव योजना मतदारसंघात राबविली . जनतेच्या समस्यांचा जागेवर निपटारा हे सुत्र त्यामागे होते . यातून खास जनतेप्रती असलेला हा अभ्यासूपणा कोणत्याही पदावर गेलो तरी सर्वसामान्य गोरगरिबांसाठीच सत्ता सर्वसामान्य साठीचा हा दृष्टिकोन दिसून येतो . त्यांच्या या कार्यपद्धतीमुळे व लोकप्रियतेमुळे त्यांच्याभोवती कायमच लोकांचा गराडा असतो . त्यामुळे आ.सुरेश आण्णा धस यांच्या बाबतीत हाकेला धावणारा आपला माणून हीच मतदारसंघात भावना आहे . राजकीय जीवनात चढउतार येतच असतात मात्र यातूनही जो पुन्हा भरारी घेतो तोच खरा नेता यांची परीचीती २०२४ च्या निडणूकीत दाखवुन दिली ऐशी हजार मतानी निडणुन आले म्हणुनच जनतेचा मनावर अधिराज्य गाजवणारा नेता त्यांना म्हटल जाते. आ.सुरेश आण्णा धस यांना वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या आगामी वाटचालीस मनापासून शुभेच्छा..!


शब्दांकन....
शेख जिलानी
अध्यक्ष दिव्यांग संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य

# मुंडे कुटुंबियांच्या हळदी कुंकू समारंभास परळी शहरातील महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

**हळदी कुंकू समारंभाच्या निमित्ताने स्नेह - सौहार्द जपण्याची संधी - मंत्री पंकजाताई मुंडे यांचीही उपस्थिती**
**महिला भगिनिंच्या सुख - दुःखात सहभागी होऊन आनंद मिळतो - सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे**
**आज दुसऱ्या दिवशी परळी तालुक्यातील व मतदारसंघातील महिला होणार सहभागी**





परळी (प्रतिनिधी)
परळी वैजनाथ येथे सौ. राजश्रीताई मुंडे यांच्या संकल्पनेतून व मुंडे कुटुंबियांच्या वतीने मकर संक्रांती निमित्त प्रतिवर्षी प्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या हळदी - कुंकू समारंभास पहिल्या दिवशी (शुक्रवार ता. ३१) परळी शहरातील महिला भगिनींनी हजारोच्या संख्येने सहभागी होत उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी हळदी - कुंकू तसेच तीळ गूळ देत एकमेकांना शुभेच्छा देण्यात आल्या.

हळदी कुंकू समारंभाच्या माध्यमातून सर्व महिलांची भेट होते. आपसातील स्नेहभाव तसेच सौहार्द वृध्दींगत होतो. एकमेकांच्या कुटुंबांना शुभेच्छा देण्याची आणि तीळ गूळ देण्या घेण्याची संधी उपलब्ध होते, त्यामुळे अशा कार्यक्रमांचे आयोजन केले गेले पाहिजे, असे मत यावेळी पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केले. तसेच सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे व अन्य सर्वच भावजयांना नणंद या नात्याने शुभेच्छा व आशीर्वाद देत पंकजाताई मुंडे यांनी या समारंभास विशेष उपस्थिती लावली. मुंडे कुटुंबाच्या वतीने प्रत्येक सण - उत्सव सर्वांसोबत मिळून मिसळून साजरा करण्याची परंपरा जोपासली आहे. सर्वांच्या सुख - दुःखात सहभागी होऊन एक वेगळाच आनंद मिळतो, असे मत यावेळी सौ. राजश्री ताई धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले. या समारंभास सौ. मनीषाताई अजय मुंडे, सौ. सरिता विजय मुंडे, सौ. अमृता रामेश्वर मुंडे, सौ. सोनाली अभय मुंडेयांसह आदी तसेच परळी शहरातील महिला भगिनी हजारोंच्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. हा समारंभ यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी जिल्हा परिषद गटनेते अजयभाऊ मुंडे, यांसह शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, नाथ प्रतिष्ठान सचिव नितीन कुलकर्णी, राजेंद्र सोनी, बाळु लड्डा, यांचे विशेष सहकार्य लाभले. दरम्यान आज पुन्हा हा समारंभ परळी ग्रामीण व मतदारसंघातील महिलांसाठी



## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भालगाव येथे स्नेसंमेलन मोठया उत्साहात संपन्न

ताडहादगाव /प्रतिनिधी
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भालगाव केंद्र ताडहादगाव येथे शाळेचे शिस्तप्रिय,गुणवान मुख्याध्यापक महावीर शेलार सर, नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारे उपक्रमशील शिक्षक नरेंद्र रत्नपारखे सर, प्रदीप जाधव सर, चक्रपाणी मुळे सर भीमराव ढाकणे सर, सारीखा इंगळे मॅडम,मस्के मॅडम,चौधरी मॅडम, वानखेडे मॅडम, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कारभारी मस्के, उपाध्यक्ष,

सन्माननीय सदस्य, सरपंच उपसरपंच, सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला भगिनी आदींच्या प्रमुख उपस्थितीत स्नेहसंमेलनचा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात घेण्यात आला असून विद्यार्थ्यांनी विविध गाण्यावर उत्कृष्ठ नृत्य सादर केले असून गावकऱ्यांची मने जिंकली आहे. गावकऱ्यांनी विद्यार्थ्यांना बक्षिसाचा वर्षाव केला आहे, विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील विविध कला निर्माण व्हाव्यात, त्यांच्यात आवड निर्माण व्हावी,यासाठी स्नेसंमेलनाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते आणि तो कार्यक्रम मोठ्या उत्साहात यशस्वीपणे संपन्न झाला असून गावकऱ्यांचा मोठा प्रतिसाद होता. यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य, सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील,गावकरी, महिला भगिनी, विद्यार्थी, अंगणवाडी सेविका, गावातील प्रतिष्ठित नागरिक, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे सांस्कृतिक स्नेहसंमेलन कार्यक्रमामध्ये चिमुकल्याने जिंकली प्रेक्षकांची मने

बीड (प्रतिनिधी)
श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे दिनांक ३१ जानेवारी २०२५ वार शुक्रवार या दिवशी स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि प्रतिमापूजनाने मान्यवरांच्या हस्ते झाली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती श्रेया कदम मॅडम तसेच शाळेचे अध्यक्ष श्री पारगावकर सर ,श्रीमती स्नेहा पारगावकर ,सचिव शेख पाशा सर ,उपमुख्याध्यापिका श्रीमती अनिता सूर्यवंशी मॅडम, लोळगे चंपावती महोत्सवाचे अध्यक्ष प्रतीक कांबळे सर, मोठ्या संख्येने पालक वर्ग विद्यार्थी आणि त्यांचे नातेवाईक इत्यादी उपस्थित होते सुरुवातीला गणेश वंदनाचे विद्यार्थ्यांनी साजरीकरण केले.




या कार्यक्रमांमध्ये पूर्व प्राथमिक गटातील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत तसेच आज हे संडे आणि आई-वडिलावर आधारित गीतावर बहारदार नृत्य सादर केले. या गीतामध्ये प्रत्यक्ष आई-वडिलांनीही स्वतःचा सहभाग नोंदवला आणि उत्कृष्ट नृत्य सादर केले. प्राथमिक गटातील विद्यार्थ्यांनी भाऊ-बहीण, आजी आजोबा ,मैत्री यावर आधारित उत्कृष्ट नृत्य सादर केले. तसेच सहावी ते नववी गटातील विद्यार्थ्यांनी स्त्री भृण हत्या, अंधश्रद्धा निर्मूलन, तानाजी ,गरबा ,वंदे मातरम, जुने पुराने हिंदी गाणे, शिक्षणाचे महत्व ,इत्यादी गाण्यावर बहारदार नृत्य सादर केले. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे या कार्यक्रमासाठी मुंबई बोरिवली येथील श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथील प्राचार्या ,शिक्षणतज्ञ श्रीमती श्रेया कदम मॅंडम खूप व्यस्त असतानाही आवर्जून या कार्यक्रमासाठी हजर राहिल्या आणि सर्व शिक्षकांना आणि पालकांना त्यांनी खूप चांगल्या पद्धतीने मार्गदर्शन केले. त्यांचा परिचय शिक्षिका श्रीमती पूजा मॅडम यांनी दिला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपूर्वा कुलकर्णी मॅडम आणि स्वाती पाटील मॅडम या दोघींनी केले. तसेच डान्स कोरिओग्राफर किरण सर आणि नेहा मॅडम या दोघांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम या गीताने झाली हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद, सहकारी यांचे सहकार्य मिळाले.

# साने गुरुजी विद्यालयाचे स्नेह संम्मेलन उत्साहात संपन्न

केज/प्रतिनिधी
साने गुरुजी निवासी प्रा.मा.उच्च माध्यमिक विद्यालय केज व नरेंद्रजी मोदी परिचारिकाप्रशिक्षण संस्था आयोजित वार्षिक स्नेह सम्मेलन आयोजित करण्यात आले होते.या स्नेह सम्मेलनाचे उद्धाटन श्री.डी.बी.क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की,या वार्षिक स्नेह सम्मेलनात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो शिक्षणा बरोबरच आपल्या आवडता छंद जोपासला जातो साने गुरुजीनिवासी विद्यालय शैक्षणिक गुणवत्तेसह विविध क्षेत्रात विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा या सतत कार्यरत असते यानिवासी शाळेने अल्पावधीतच जिल्ह्यात नावलौकिक प्राप्त करुन क्रीडा क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली बेसबॉल व सॉफ्टबॉल या खेळात आत्तापर्यंत पन्नासच्या वर राष्ट्रीय खेळाडू निर्माण करुन बीड जिल्ह्याची मान उंचावली असुन कमी शिकलेले असुनही क्रिकेटचा देव म्हणून भारतरत्न मिळविलेले सचिन तेंडुलकर दोनदा दहावी नापास आहे.तर एकच दिवसाची शाळा शिकलेल्या स्वर्गीय लता मंगेशकर यांनी सुद्धा भारतरत्न प्राप्त केले या वरुन आपल्या छंदाला पशन बनवून जिद्द व चिकाटीने आपली कला जोपासली तर काही ही साध्य करता येते त्या खेळ असो किंवा असे सांस्कृतिक कार्यक्रम यामुळे प्रत्येक शाळा, महाविद्यालय हे दरवर्षी वार्षिक स्नेह सम्मेलनाचे आयोजन करुन होतकरू विद्यार्थ्यांना आपले कलागुण सादर करण्या साठी व्यासपीठ निर्माण करुन देते असे सांगितले. या वार्षिकस्नेहसम्मेलनात विद्यार्थ्यांनी देशभक्ती पर गीत,कोळी गीत,बंजारा गीत,शेतकरी गीत, कव्वाली,आदिवासी गीत, लावणी,भारुड,तसेच हगणदारीमुक्त गाव या नाटकाने उपस्थित पालकांचे मने जिंकली या स्नेह सम्मेलनाच्या अध्यक्ष स्थानीबीडजिल्हाऊसतोड कामगार विकास मंडळाचे अध्यक्ष श्री.उद्धवराव अण्णा कराड हे



होते तर प्रमुख पाहुणे म्हणून लक्ष्मण बारगजे,निरिक्षक इतर मागास बहुजन कार्यालय,बीड,श्री.अमन सिरसाट पोलीसनिरीक्षक, वडवणी,श्री.पी.एम.ठोंबरेशाखा व्यवस्थापक, भारतीय स्टेट बँक केज, श्री.संतोष गालफाडे, अध्यक्ष सक्रिय पत्रकार संघकेज,श्री.राजेशकापसे,अरुण चाटे सरपंच तांबवा,पत्रकार गौतम बचुटे तसेच बीड जिल्हा तील आश्रम शाळा मुख्याध्यापक उपस्थित होते.

# पावनधाम येथे जगद्गुरु संत तुकाराम जन्मोस्तव सोहळा आज संपन्न होणार

**केज/प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील पावनधाम येथे जगद्गुरु श्रीसंत तुकाराम महाराज सोहळा आज साजरा होणार असल्याची माहिती पावनधामचे महंत ह.भ.प.महादेव महाराज शास्त्री यांनी दिली आहे.**

जगद्गुरू तुका अवतार नामयाचा । सांप्रदाय सकळांचा येथोनिया ।। श्रीमंत श्री.जगद्गुरू तुकोबारायांचा जन्मोत्सव तिथी.माघ शुद्ध ४/५ वसंतपंचमी दि.२फेब्रुवारी २०२५ रोजी रविवार रोजी श्री.जगद्गुरू तुकोबाराय पावनधाम संस्थान वर महाराजांचा जन्मोत्सव भव्य प्रमाणात साजरा होणार आहे.त्या निमित्त सकाळी १० ते१२ या वेळेमध्ये ह.भ.प.श्री. दत्ता महाराज अंबिरकर यांचे किर्तन होणार आहे. व नंतर श्री.नारायण दिगांबर जगताप यांच्या वतीने महाप्रसाद होणार आहे.तरी परिसरातील सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन पावनधाम संस्थानचे महंत ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री यांनी केले आहे.

केज तालुक्यातील पावनधाम येथे जगद्गुरु श्रीसंत तुकाराम महाराज सोहळा आज साजरा होणार असल्याची माहिती पावनधामचे महंत ह.भ.प.महादेव महाराज शास्त्री यांनी दिली आहे.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**वाचा :- १. जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम -२०२३**
**दिनांक : ०१/०४/२०२४**
**२. अर्जदार. श्री/ परसराम सिताराम वैद्य रा. रोहिलागड ता.अंबड जि.जालना यांनी त्यांचे नामे यांचा अर्ज दि. १४/०३/२०२४**
**३. या कार्यालयाची तजवीज दिनांक. २१/०३/२०२४**

**जाहिर प्रगटन**

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता मौजे. रोहिलागड ता. अंबड यांना या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, श्री/श्रीमती/कु/ श्री/श्रीमती. परसराम सिताराम वैद्य रा. रोहिलागड ता. अंबड जि.जालना येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे श्री/श्रीमती/ नामे माझे कु./श्री/श्रीमती. जयश्री परसराम वैद्य यांची त्यांनी मृत्यूची दिनांकः ०१/०७/१९२७ रोहिलागड ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद/मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप/आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुनं ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे.मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरून अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/०४/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तालुका दंडाधिकारी अंबड.**

**जाहिर प्रगटन**

माझे पक्षकार नामे श्रीकृष्णा पि. माणिक शिंदे वय ४१ वर्षे, धंदा नौकरी व शेती रा. नागझरी पो.रेवकी ता. गेवराई जि. बीड. मो.क्र. ९३०९७७११८२ यांनी मला दिलेलया सुचना, माहिती व अधिकारपत्रावरुन सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे वरील पक्षकाराने मे. दिवाणी न्यायाधिश साहेब, गेवराई ता. गेवराई जि.बीड यांच्या कोर्टात मौजे आगर नांदुर ता.गेवराई जि. बीड येथील गट क्र. १५७ मधील एकुण क्षेत्र ०८ हे. ०७ आर, आकर ३५ रु.३५ पैसे यापैकी खालील चतु:सिमेतील ०१ हे ०० आर जमिनीचे अनुषंगाने दिलेला रे.दि.मु.नं. ७९७ /२०२० श्रीकृष्णा विरुध्द माणिक व इतर ०६ यांच्या विरुध्द दिलेला दावा मे. कोर्टात प्रलंबित असतांना खालील चतुः सिमेतील पुर्वेस - चारी नं.२७, पश्चिमेस - माझे पक्षकार श्रीकृष्णा यांचे नावावरील जमिन, दक्षिणेस रंगनाथ शिंदे यांची जमिन व उत्तरेस - लहु श्रीराम शिंदे यांची जमिन यापैकी पुर्वेकडील बाजुने दक्षिण उत्तर दिशेमध्ये ०० हे. ४० आर जमिनीचे उसणवार रक्कमेवर धर म्हणुन माणिक श्रीराम शिंदे यांनी करुन दिलेल्या चुक, बोगस, व बेकायदेशिर ताबा विहीत / विनाताबा जालिंदर पि. बप्पाजी बेदरे यांच्या नावावर करुन दिलेली खरेदीखता नंतर त्यांचे अकाली निधन झल्यामुळे सदर ०० हे. ४० आर जमिनीचे वारसदार नामे छाया जालिंदर बेदरे, कावेरी हनुमान जगताप, शारदा परमेश्वर धांडे, जमुनाबाई श्रीकांत गवळी, संभाजी पि. जालींदर बेदरे, शिवाजी जालींदर बेदरे, हे सहा जण त्यांच्या नावावरील वारसदार म्हणुन ७/१२ चे मालकी हक्कात नोंद झाल्याचा गैरफायदा घेवुन वरील दावा प्रलंबित असतांना वरील ०० हे. ४० आर जमिन विक्री करण्याचे विचारात असुन त्यांच्या तशा प्रकारच्या हालचाली सुरु झाल्याचे माझ्या पक्षकाराच्या निदर्शनास आल्यावरुन संभव्य खरेदीदाराची फसवणुक टाळण्याच्या दृष्टीकोणातुन माझे पक्षकार सदर जाहिर प्रगटनाद्वारे वरील हकीगत ज्ञात करुन वरील नमुद वर्णनाचे ०० हे. ४० आर जमिनीचे अनुषंगाने वरील नमुद सहा लोंका बरोबर खरेदी विक्रीचा बक्षीस, दान, तारण, गहाण, बटाई, ठोक्याचा व अन्य कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये व व्यवहार केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील करीता या जाहिर प्रगटनाद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते सबब हे जाहिर प्रगटन.

**दि.३०/०१/२०२५**
**गेवराई**

**पक्षकार**
**स्वाक्षरित/-**
**श्रीकृष्णा माणिक शिंदे**

**मार्फत,**
**स्वाक्षरित/-**
**ॲड.जी.एस. यादव,गेवराई**

**श्रीमती ए.एम.गायकवाड, दिवाणी न्यायाधिश, क. स्तर अंबड ता.अंबड जि.जालना यांच्या न्यायालयात**
**कि.दि. अर्ज क्र.२६ / २०२५**
**विश्वंभर विरूध्द निरंक**
**नि.क्र.**
**पुढील तारीख ०४/०३/२०२५**
**अर्जदार**
**विश्वंभर पि. सुधाकर जोशी**
**वय ५८ वर्षे, धंदा - शेती**
**रा.गोंदी ता.अंबड जि.जालना**
**गैरअर्जदार - निरंक**

**जाहिर प्रगटन**

कलम-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ व ७ अन्वये वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदार यांनी विधीज्ञ यांच्यामार्फत या न्यायालयात असा अर्ज केला की, अर्जदार यांचे वडील नामे मयत सुधाकर पि. त्रिविक्रम जोशी हे दि. ०६/०३/२०१९ रोजी मयत झाले अर्जदार हे मयत सुधाकर पि.त्रिविक्रम जोशी यांचे एकमेव वारस आहे. अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

करीता या जाहिर प्रगटन द्वारे सर्वत्र कळविण्यात येते की, या बाबत जर कोणास काही एक आक्षेप असेल तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस (३०) दिवसांच्या आत या न्यायालयात आपला आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या काळात कोणाचाही आक्षेप आला नाही, तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०१/०२/२०२५ रोजी यांची माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

**स्वाक्षरित**
**दिवाणी विभाग**
**प्रमुख**

**आदेशान्वये**
**स्वाक्षरित**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**क.स्तर, अंबड जि.जालना**

# कार्यकर्त्यांच्या प्रेमामुळे कधीच वाटलं नाही मी एकटी आहे

# जालन्यात ना. पंकजाताई मुंडे यांचा भाजप पदाधिकाऱ्यांशी संवाद



## एक हजार सदस्य नोंदणी करणाऱ्या कार्यकर्त्यांचा केला सन्मान शिवसेना जिल्हाप्रमुखांच्या निवासस्थानीही दिली भेट



जालना । लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जाण्यानंतर जबाबदारी वाढली, यात काम करत असतांना कार्यकर्त्यांचे एवढे प्रेम मिळाले की कधीच वाटलं नाही मी एकटी आहे, त्यामुळे माझ्यात आणि कार्यकर्त्यांत कधीच अंतर पडू देणार नाही असे भावोदगार राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे काढले.

ना. पंकजाताई मुंडे यांनी आज शहरातील भाजप संपर्क कार्यालयास भेट देऊन पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला त्यावेळी त्या बोलत होत्या. आ. संतोष दानवे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, भास्कर दानवे, सुनील आर्दड, अवधूत खडके आदींसह पदाधिकारी, नगरसेवक, सर्व तालुक्याचे मंडलाध्यक्ष यावेळी उपस्थित होते.

जिल्हयाच्या पालकमंत्री झाल्याबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या स्वागताला प्रचंड गर्दी झाली होती, हा धागा पकडून बोलतांना त्या म्हणाल्या, गर्दी आणि मुंडे हे समीकरण जुनेच आहे. मुंडे साहेबांपासून आमचे जालना जिल्ह्याशी जिव्हाळ्याचे संबंध आहेत. केंद्रीय मंत्री म्हणून चांगले काम करणारे रावसाहेब दानवे आणि मुंडे साहेब यांनी गावोगाव जाऊन कार्यकर्ता जोडला, पक्ष वाढवला. मुंडे साहेबांच्या जाण्यानंतर जबाबदारी वाढली तथापि काम करतांना कार्यकर्त्यांच्या प्रेमामुळे कधीच वाटल नाही मी एकटी आहे. जात धर्माच्या पलिकडे जाऊन काम करण्याचे संस्कार आमच्यावर आहेत. फंड मिळेल नाही मिळेल, एखादे काम होईल नाही होईल पण कार्यकर्त्यांमध्ये कधी अंतर पडू देणार नाही असं त्या म्हणाल्या.

### शिवसेना जिल्हाप्रमुखांच्या निवासस्थानी भेट

ना. पंकजाताई मुंडे यांनी छत्रपती संभाजीनगरकडे रवाना होण्यापूर्वी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी घुगे परिवाराच्या वतीने त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. आ. अर्जुन खोतकर, आ. हिकमत उढाण, संपर्क प्रमुख पंडित भुतेकर यावेळी उपस्थित होते.

### एक हजार सदस्य नोंदणी करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान

संघटन पर्व अंतर्गत एक हजार सदस्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा यावेळी ना. पंकजाताई मुंडे हस्ते सन्मान करण्यात आला.पक्षाचा प्रत्येक आदेश तंतोतत पाळा. प्रत्येकाने एक हजार सदस्य करावेत आणि विक्रमी नोंदणी करावी असं आवाहन त्यांनी केलं. कार्यक्रमानंतर ना. पंकजाताईंनी लोकनेते मुंडे साहेब चौकातील मुंडे साहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

---

# मुख्याध्यापिका अनिता जोगदंड यांना सेवापूर्तीनिमित्त निरोप



वडवणी (प्रतिनिधी):- जिल्हा परिषद केंद्रिय कन्या प्राथमिक शाळा वडवणी या शाळेतील केंद्रिय मुख्याध्यापिका अनिता खुशालराव जोगदंड (वंजारे) या नियत वयोमानानुसार दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी आपल्या प्रदिर्घ शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या आहेत. त्यांच्या या सेवापूर्तीनिमित्त त्यांना हृदयपूर्वक निरोप देण्यात आला. यानिमित्त वडवणीत सेवापूर्ती सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी कन्या केंद्राचे केंद्रप्रमुख सैलानी शेख सर, वडवणीचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे सर, चिंचवणचे केंद्रप्रमुख सुनिल मुंडे सर, केंद्रिय मुख्याध्यापिका संगिता कराड मॅडम, यांसह सहकारी शिक्षक बांधव, मित्रमंडळी, कौटुंबिक सदस्य व इतर मान्यवर उपस्थित होते. अनिता खुशालराव जोगदंड (वंजारे) या मुळच्या बीड येथील रहिवासी असून दिनांक ३ सप्टेंबर १९८८ रोजी त्यांची शिक्षण क्षेत्रात प्रथम नेमणूक झाली होती. त्यांनी एकूण तब्बल ३६ वर्ष प्रदिर्घ शासकीय सेवा बजावली असून त्यांची संपूर्ण सेवा ही बीड आणि वडवणी या दोन तालुक्यांमध्येच पूर्ण झालेली आहे. आपल्या ३६ वर्षांच्या यशस्वी शासकीय कारकीर्दीनंतर त्या आज नियत वयोमानानुसार आपल्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या आहेत. त्यांच्या या सेवापूर्तीनिमित्त वडवणी या ठिकाणी या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सेवानिवृत्त झालेल्या केंद्रिय मुख्याध्यापिका अनिता जोगदंड यांचा शाल, पुष्पहार, पुष्पगूच्छ व जोड आहेर देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अनेक मान्यवरांनी जोगदंड मॅडम यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदान, विद्यार्थ्यांसाठी घेतलेले कष्ट आणि त्यांच्या नेतृत्वगुणांविषयी व एकंदरीत सेवा कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी ते म्हणाले की, जोगदंड मॅडम यांचा हा सेवानिवृत्ती समारंभ हा एक विशेष प्रसंग आहे, जिथे त्यांना त्यांच्या यशस्वी प्रदिर्घ सेवेसाठी सन्मानित करण्यात येत आहे. जोगदंड मॅडम यांनी शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या अध्यापन शैलीमुळे अनेक विद्यार्थी घडले आणि त्यांनी आपल्या कार्याने समाजात एक सकारात्मक बदल घडवला. त्यांच्या समर्पणामुळे शिक्षक, पालक आणि विद्यार्थी वर्गामध्ये त्यांच्याविषयी आदराची भावना आहे.

# आदित्य ग्रीन कंपनीला पर्यायी जागा द्यावी

## युवा आंदोलनचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

बहुजनांच्या न्याय हक्कांसाठी लढणारी युवा आंदोलन ही संघटना मौजे जवळगाव (ता.अंबाजोगाई) येथील भूमिहीन मागासवर्गीय समाज बांधवांना न्याय मिळवून देण्यासाठी सरसावली आहे. आदित्य ग्रीन कंपनीला मौजे जवळगाव (ता.अंबाजोगाई) शिवारातील दिलेली गट नं-२११ मधील सस्कारी गायरानातील जमिनीचा करार रद्द करून पर्यायी जागा देण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकारी, बीड यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

युवा आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अशोक पालके यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी, बीड यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आदित्य ग्रीन कंपनीला मौजे जवळगाव (ता.अंबाजोगाई) शिवारातील दिलेली गट नं-२११ मधील सरकारी गायरानातील जमिनीचा करार रद्द करून पर्यायी जागा देण्यात यावी. कारण, दिलेल्या जमीनीवर भूमीहिन मागासवर्गीयांचे अतिक्रमण आहे. ते मौजे जवळगाव शिवारातील गट नंबर - २११ मधील सरकारी गायरान जमीन ४३ वर्षांपासून पिकवून आमचा उदरनिर्वाह भागवतो सदरील जमीनीवरील अतिक्रमण निलंबित करावे म्हणून आम्ही तहसिलदार, अंबाजोगाई यांना वेळोवेळी अर्ज दिला आहे. आमच्या या जमिनीतील पिकांचे पीक पंचनामे तहसिलदार, अंबाजोगाई यांच्या मार्फत झालेले आहेत व त्या पीक पंचनाम्याचे रेकॉर्ड उपलब्ध आहे. या मधील ०२ वाहितीदारांचे गांव नमुना नंबर ०१ई ला नोंद तहसील कार्यालयाने केलेली आहे. तेही रेकॉर्ड उपलब्ध आहेत म्हणजे वहिती अंमल आहे. सद्य परिस्थिति मध्ये आदित्य ग्रीन प्रा.कंपनी मार्फत सरकारी गायरानातील अतिक्रमणधारक यांच्या उभ्या पिकांचे नुकसान करून त्यांनी मुलाप्रमाणे जपलेली झाडे तोडली जात आहेत. हे सर्व आपल्या महसूल प्रशासन, पोलिस प्रशासन यांना हाताशी धरून धडपशाही केली जात आहे. शासनाची भूमिहीन मागासवर्गीयांसाठी दादासाहेब गायकवड यांच्या नांवाने सबलीकरण योजना राबविली जाते. पण, येथे जे भूमीहीन शासनाची पडीक जमीन पिकून आपला उदरनिर्वाह करतात. त्यांचा ताब्यातील जमिनीवर विकासाच्या नांवाखाली पिकावर नांगर फिरवला जातो. हे पुरोगामी महाराष्ट्राला शोभणारे नाही. तरी याप्रकरणी आपण लक्ष घालून प्रत्यक्ष सर्व पुरावे पाहून आम्हाला न्याय द्यावा सदरील कंपनीला पर्यायी जागा उपलब्ध करून यावी व ज्या महसूल प्रशासनातील अधिकारी कर्मचारी यांनी चुकीचा पंचनामा करून खरी माहिती लपविली त्या अधिकारी, कर्मचारी यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करावी अशी विनंती करून जर शासन व प्रशासन यांनी वरील करार रद्द केला नाही तर युवा आंदोलन संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. त्यास शासन व प्रशासन जबाबदार असेल असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर युवा आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अशोक पालके, बेटी बचावचे धीमंत राष्ट्रपाल, माजी सरपंच हनुमंत गायकवाड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदन देताना मौजे जवळगाव (ता.अंबाजोगाई) येथील भूमिहीन मागासवर्गीय स्त्री, पुरूष समाज बांधव उपस्थित होते.

---

# गंगाई - बाबाजी महोत्सव हा राज्यातील अत्यंत दिमाखदार सोहळा - सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री कल्याणी चौधरी




**आष्टी (प्रतिनिधी)**

**शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा आष्टी - पाटोदा - शिरूर चे माजी आमदार, शिक्षणमहर्षी भीमराव धोंडे साहेब यांच्या आई वडिलांच्या नावाने गेली १९ वर्षे सुरू असलेला गंगाई - बाबाजी महोत्सव आणि गंगाई - बाबाजी आदर्श पुरस्कार वितरण सोहळा हा राज्यातील अत्यंत आगळावेगळा आणि दिमाखदार सोहळा आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री कल्याणी चौधरी यांनी केले.**

भगवान महाविद्यालय आष्टीच्या वतीने आयोजित गंगाई - बाबाजी महोत्सवानिमित्त दिल्या जाणाऱ्या गंगाई - बाबाजी आदर्श पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा आष्टी - पाटोदा - शिरूरचे माजी आमदार, शिक्षणमहर्षी भीमराव धोंडे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्यास पाटोदा पंचायत समितीच्या माजी सभापती सुवर्णाताई लांबरुड, ह. भ. प. दिनकर महाराज तांदळे, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे डॉ. अजय दादा धोंडे, अभय दादा धोंडे, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, रामराव खेडकर, रामदास बडे, पांडुरंग नागरगोजे, रत्नदीप निकाळजे, बबनराव आवटे, सुदाम काका झिंजुर्के, सरपंच दादा जगताप, अन्सार शेख, अशोक साळवे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, सिने पत्रकार भगवान राऊत, रावसाहेब लोखंडे, बाळासाहेब शेकडे, महारुद्र खेडकर, सदाशिव तुपे, संतोष गोल्हार, राजेंद्र धोंडे, आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी बोलताना सिने अभिनेत्री कल्याणी चौधरी म्हणाल्या की, माजी आमदार भीमराव धोंडे साहेब यांनी बीड जिल्ह्यातील आष्टी - पाटोदा - शिरूर या ग्रामीण भागातील शेतकरी, ऊस तोडणी कामगार व गोरगरिबांच्या मुला - मुलींच्या शिक्षणासाठी शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून या दुष्काळी भागामध्ये शिक्षणाची गंगा आणली. त्यामुळे हजारो तरुण तरुणींना शिक्षण घेऊन स्वताच्या पायावर उभे राहता आले. त्यामुळे मा. आ. भीमराव धोंडे शिक्षण महर्षी या नावाने संबोधले जावे. असे त्यांचे शैक्षणिक क्षेत्रात महान कार्य आहे. त्यांच्या आई - वडिलांच्या चिरंतन स्मृती जपण्यासाठी ते गेली १९ वर्षे गंगाई - बाबाजी महोत्सवाच्या माध्यमातून समाजातील गुनिजनांचा गंगाई बाबाजी आदर्श पुरस्कार देऊन सन्मान करतात. समाजातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या गुणवंतांच्या पाठीवर पुरस्काराच्या रूपाने शाबासकीची थाप देतात. या पुरस्कारामुळे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांना आणखी जोमाने काम करण्याची प्रेरणा, प्रोत्साहन आणि बळ मिळते. त्यामुळे अशा कार्यक्रमाची समाजाला गरज आहे असे त्या म्हणाल्या. माजी आमदार भीमराव धोंडे साहेब म्हणाले की, विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या पुरस्कार प्राप्त मान्यवर व्यक्तींकडून विद्यार्थी विद्यार्थिनींनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करण्याची प्रेरणा घ्यावी. आपल्या जन्मदात्या आई - वडिलांची मनोभावे सेवा करावी. ज्यांनी आपल्याला हे जग दाखविले त्या आपल्या आई - वडिलांना दैवत मानावे. विद्यार्थी, विद्यार्थिनींना आपले चांगले भवितव्य घडविण्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा कुठलाही पर्याय उपलब्ध नाही. आगामी काळात चांगला समाज घडविण्यासाठी सर्वांनी सामूहिकपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले. 'वाचाल तर वाचाल आणि शिकेल तो टिकेल' असेही ते शेवटी म्हणाले. सर्व पुरस्कार प्राप्त गुणवंतांचे त्यांनी कौतुक केले व भविष्यकालीन वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी ह. भ. प. पांडुरंग जाधव गुरुजी, प्राचार्य निंबोरे सर व साहित्यिक प्रा. डॉ. सुधाकर शेलार या पुरस्कार प्राप्त मान्यवरांनी आपली प्रातिनिधीक स्वरूपातील मनोगते व्यक्त केली. प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. ज्ञानदेव वैद्य यांनी उपस्थितांचा परिचय करून दिला. उपप्राचार्य डॉ. अप्पासाहेब टाळके, प्रा. श्रीकांत धोंडे व प्रा. संभाजी झिंजुर्के यांनी सूत्रसंचालन केले. तर प्रा. बापू तोरडमल यांनी आभार मानले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व गंगाई - बाबाजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. तर सामूहिक राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला. या कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी, पुरस्कार प्राप्त, गुणवंत, त्यांचे नातेवाईक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व आष्टी पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सहशिक्षक आसाराम गिरी यांना सेवापूर्तीनिमित्त निरोप

वडवणी (प्रतिनिधी):- जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा वडवणी या शाळेतील ज्येष्ठ सहशिक्षक आसाराम उत्तमबूवा गिरी हे नियत वयोमानानुसार दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी आपल्या प्रदिर्घ शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या या सेवापूर्तीनिमित्त त्यांना हृदयपूर्वक निरोप देण्यात आला. यानिमित्त वडवणीत सेवापूर्ती सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी माजी आमदार केशवराव आंधळे, वडवणीचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे, वडवणीचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे सर, कन्या वडवणीचे केंद्रप्रमुख सैलानी शेख सर, चिंचाळाचे केंद्रप्रमुख पवनराजे देशमुख सर, केंद्रिय मुख्याध्यापिका संगिता कराड मॅडम यांसह सहकारी शिक्षक बांधव, मित्रमंडळी कौटुंबिक सदस्य व इतर मान्यवर उपस्थित होते. आसाराम उत्तमबूवा गिरी हे मूळ चौंडी तालुका धारुर येथील रहिवाशी असून दिनांक ३ ऑगस्ट १९९८ रोजी त्यांची शिक्षण क्षेत्रात प्रथम नेमणूक झाली होती. त्यांनी एकूण २७ वर्ष प्रदिर्घ शासकीय सेवा बजावली असून त्यांची संपूर्ण सेवा ही धारुर आणि वडवणी या दोन तालुक्यांमध्येच पूर्ण झालेली आहे. २७ वर्षांच्या यशस्वी शासकीय कारकीर्दीनंतर ते आज नियत वयोमानानूसार आपल्या सेवेतून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांच्या या सेवापूर्तीनिमित्तच वडवणी या ठिकाणी या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सेवानिवृत्त झालेले सहशिक्षक आसाराम गिरी सर यांचा सपत्नीक शाल, पुष्पहार, पुष्पगूच्छ व जोडआहेर देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अनेक मान्यवरांनी गिरी सर यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदान, विद्यार्थ्यांसाठी घेतलेले कष्ट आणि त्यांच्या नेतृत्व गुणांविषयी व एकंदरीत सेवा कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी ते म्हणाले की, गिरी सर यांचा हा सेवानिवृत्ती समारंभ हा एक विशेष प्रसंग आहे, जिथे त्यांना त्यांच्या यशस्वी प्रदिर्घ सेवेसाठी सन्मानित करण्यात येत आहे. गिरी सर यांनी शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. त्यांच्या अध्यापन शैलीमुळे अनेक विद्यार्थी घडले आणि त्यांनी आपल्या कार्याने समाजात एक सकारात्मक बदल घडवलेला आहे. त्यांच्या समर्पणामुळे शिक्षक, पालक आणि विद्यार्थी वर्गामध्ये त्यांच्याविषयी आदराची भावना आहे. त्यांचे आजवरचे सेवा कालावधीतील आयुष्य हे अतिशय धकाधकीचे व व्यस्त असे गेलेले आहे. आता सेवानिवृत्तीनंतरचे त्यांचे आयुष्य सुख, समाधान, आनंदी व निरोगी जावे अशा मनोकामना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केल्या. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विठ्ठल मुंडे सर यांनी केले. तर शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मारोती मोतवार सर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संगिता तिडके मॅडम, मारोती मोतवार सर, सुभाष लतीबे सर, सदाशिव तिडके सर, विष्णू डोईफोडे सर, केकान मॅडम, हंगे मॅडम, मुंडे मॅडम, केकान मॅडम यांनी परिश्रम घेतले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बँक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG



# शिवसंग्राम जिल्हा कार्यकारिणी बरखास्त

## शिवसंग्रामच्या नूतन जिल्हाध्यक्षपदी प्रा. सुभाष जाधव सर यांची निवड जाहीर







### अनिल घुमरे जिल्हा सरचिटणीस, पंडित माने बीड तालुकाध्यक्ष, सुहास पाटील बीड शहराध्यक्ष व दिनकर शेळके बीड तालुका उपाध्यक्ष यांच्या निवडीही जाहीर

बीड (प्रतिनिधी)

शिवसंग्राम संघटनेची बीड जिल्हा कार्यकारीणी बैठक शिवसंग्राम भवन बीड येथे शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रदेश उपाध्यक्ष श्री. प्रभाकर अप्पा कोलांगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार, दि. ३० जानेवारी रोजी संपन्न झाली.येत्या काळात येऊन ठेपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था व बीड नगर पालिका निवडणूक अनुषंगाने तसेच पक्षबांधणी विस्तार अनुषंगाने जिह्वा कार्यकारिणी बरखास्त करून काल शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई मेटे यांनी नूतन जिल्हाध्यक्षपदी प्रा.सुभाष जाधव सर, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, बीड तालुकाध्यक्ष पंडित माने, बीड तालुका उपाध्यक्षपदी दिनकर शेळके व बीड शहराध्यक्षपदी सुहास पाटील यांच्या निवडी जाहीर केल्या.उर्वरित निवडी यथावकाश जाहीर करण्यात येतील असे यावेळी सांगण्यात आले.

याप्रसंगी जिल्ह्यातील उपस्थित पदाधिकारी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना डॉ. ज्योतीताई मेटे यांनी सांगितले की,आगामी काळात झोकून काम करण्याची तयारी नवनिर्वाचित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ठेवा .प्रत्येकाने जबाबदारी ओळखून जबाबदारीने काम करावे.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांकडून १००% कामाची अपेक्षा आहे.नगरपालिका पंचायत समिती जिल्हा परिषद निवडणुका समोर ठेवून या निवडी करण्यात आलेले आहेत. शिवसंग्राम अंतर्गत आगामी काळात नवीन आघाडी तयार केल्या जातील. ग्रामीण व शहरी भागात जास्तीत जास्त कार्य करावे. येत्या काळात जास्तीत जास्त पदाधिकारी कार्यकर्त्यांचे जाळे बीड जिल्ह्यात करावयाचे आहे. पक्षाची शिस्त पाळा.पक्षामध्ये एक कुटुंब म्हणून वागा. तरुणांनी बदल करायची हिंमत दाखवली पाहिजे सकारात्मकता, आक्रमकपणा कार्यकर्त्यांने अंगी बनवावा. सदैव हिरोच्या भूमिकेत रहा,आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती संपूर्ण जागा स्वहिमतीवर लढायच्या आहेत मराठा आरक्षण, अरबी समुद्रातील छत्रपती शिवरायांचे स्मारक,शेतकऱ्यांना निवृत्ती वेतन देण्याकरिता यापुढील वाटचाल करायचे आहे. सोशल मीडियावर सतर्क रहा,शिवसंग्रामचा झेंडा डौलाने फडकवत दिलेल्या जबाबदारीला जागा, संघटनेला व स्वतःला मोठे करा अशा स्पष्ट शब्दांत उपस्थित कार्यकर्त्यांना शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई मेटे यांनी मार्गदर्शन केले.



# परतूर तालुक्यातील आनंदवाडी गावातील नदीपात्रामधून अवैध वाळू उपसा जोरात सुरू

## भरधाव वेगाने चाललेल्या ट्रॅक्टर मुळे स्थानिक नागरिकांच्या जीवितास वाढतोय धोखा जिल्हाधिकारी पांचाळ लक्ष देणार का ?

परतूर (प्रतिनिधी)

परतूर तालुक्यातील आनंदवाडी येथे मागील काही महिन्यापासून रात्रंदिवस जेसीबी द्वारे तीन ते चार ट्रॅक्टर नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करीत आहेत, गावातील नागरिकांनी महसुल विभाग व पोलीस विभागाला फोन द्वारे माहिती देऊन सुद्धा कार्यवाही होत नाही महसूल व पोलीस प्रशासन कुठल्याही प्रकारची ठोस कार्यवाही करत नाही, महसुल व पोलीस प्रशासन जाणून बुजून कानाडोळा करीत असल्याचे दिसून येत आहे. काही अधिकाऱ्यांच्या हप्तेखोरी पणामुळे अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफीयांना कुठल्याही प्रकारचा धाक राहिला नाही. रात्रंदिवस भर वेगाने चालणारे ट्रॅक्टर गावातील मुला बाळांचा जीव घेऊ शकतात यांच्यावर वेळेत कारवाई केली नाही तर गावातील नागरिकांचा जीव जाऊ शकतो जिल्हाधिकारी पांचाळ यानी तत्काळ लक्ष घालावे

# शिक्षण हेच सामाजिक प्रगतीचे माध्यम आहे -रमेशराव आडसकर

केज/प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या जडणघडणी मध्ये सर्वाधिक वेळ विद्यार्थी महाविद्यालयात पर्यायाने प्राध्यापकांच्या संपर्कात असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्राध्यापक च जबाबदार असतात . म्हणूनच शिक्षण हेच सामाजिक प्रगतीचे माध्यम आहे असे प्रतिपादन छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव रमेशराव आडसकर यांनी केले.ते वसंत कनिष्ठ महा विद्यालय,केज येथे प्रा. महादेव गोविंदराव साबळे यांच्या सेवा गौरव कार्यक्रमात बोलत होते. व्यासपीठावर प्राचार्य प्रकाश धेंडे,प्राचार्य डॉ. माधवराव फावडे,रंजीत दादा आडसकर,प्रा. महादेव साबळे व इतर उपस्थित होते.

आडसकर पुढे म्हणाले की प्रा.साबळे सरांनी या ठिकाणीनिष्ठेने,प्रामाणिक शैक्षणिक योगदान देवुन विद्यार्थी घडविले. अंबाजोगाई तालुक्यातील धानोरा येथील एका शेतकरी कुटुंबातुन पुढे येवुन उच्च शिक्षण घेवून प्रा.महादेव साबळे यांनी या ठिकाणी एकतीस वर्षे शैक्षणिक अध्यापनाचे योगदान दिले.या प्रसंगी प्राचार्य धेंडे,प्राचार्य माधवराव फावडे यांनीही विचार मांडले.या प्रसंगी प्रा.महादेव साबळे यांनी १९९३ ते २०२५ या एकतीस वर्षातील काळा तील आठवणींना उजाळा दिला.संस्थेने दिलेली शाबासकीची थाप हीच माझी पुढील काळातील ऊर्जा असेल असे ही सांगितले.या कार्यक्रमात कु.वैष्णवी जोगदंड या विद्यार्थीनींने आपले मनोगत व्यक्त करून आपल्या गुरु विषयीची आत्मियता व्यक्त करून वातावरण भावुक केले.या कार्यक्रमा चे सुत्रसंचालन प्रा.शाहू साखरे तर आभार उप प्राचार्य प्रा.हेमंत देशमुख यांनी केले.



## प्रा.महादेव साबळे यांच्या सेवापुर्तीचा केला गौरव

# जागतिक सूर्यनमस्कार दिन उत्साहात साजरा

## जागतिक सूर्यनमस्कार दिनानिमित्त सुमारे १५०० विद्यार्थ्यांनी केले सामूहिक सूर्य नमस्कार प्रात्यक्षिक





बीड (प्रतिनिधी)

जागतिक सूर्य नमस्कार दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय क्रीडा व शिक्षण विभाग आणि आरोग्य विभाग व क्रीडा भारती आणि विविध योग संघटना यांच्यावतीने बीड शहरात सामूहिक सुर्य नस्काराचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा क्रीडा संकुलातील खुल्या मैदानात आज दिनांक एक फेब्रुवारी रोजी सकाळी ठीक साडेआठ वाजता झालेल्या कार्यक्रमात बीड शहरातील २५ पेक्षा जास्त शाळा योग संस्था क्रीडामंडळे आणि निवासी गुरुकुल प्रकल्प यांनी सहभाग नोंदवला होता.

कार्यक्रमासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी संघटनेचे प्रा. थोरात सावरकर महाविद्यालयाचे प्रा. वैरागर जिल्हा समन्वयक डॉक्टर अर्सुळ तसेच या कार्यक्रमाचे संयोजक तथा क्रीडा भारती जिल्हा मंत्री विनायक आणि या कार्यक्रमासाठी मुख्य प्रात्यक्षिक सादर करणाऱ्या श्रीमती राधा तांबे पुष्कराज तसेच मास्टर ट्रेनर्स शास्त्री निलेश मस्के ज्ञानेश्वर घोडके डॉ . लिमकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन विनायक वज यांनी केले.प्रथम श्री वैरागर सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यानंतर अध्यक्ष समारोप जिल्हाधिकारी सर यांनी केला. यावेळी ते म्हणाले बीड शहरात आरोग्य विषयक अनेक उपक्रम जिल्हा क्रीडा कार्यालय सरत्याने घेतले जातात. त्याचा एक भाग म्हणून आज अनेक वर्षापासून या ठिकाणी आपण जिल्हा क्रीडा संकुलावर आरोग्य विषयक सामूहिक सूर्य नमस्कार घेत आहोत. आपण एक दिवस सुर्य नमस्कार न करता नेहमीच सातत्याने वर्षभर करावेत असे आवाहन याप्रसंगी त्यांनी केले. श्रीमती राधा तांबे पुष्कराज वझे सौमिंद्र शास्त्री यांनी समंत्र बारा सूर्य नमस्कार सादर करून सर्व विद्यार्थी शिक्षक प्रशिक्षक नागरिक यांचेकडून करून घेतले .यानंतर ध्यान ओंकार घेऊन डॉ. राजाभाऊ अडसूळ यांचे आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.सर्व विद्यार्थ्यांना सुरज आणि मनोज लाहोटी या प्रतिष्ठित योगसाधक व्यापारी परिवाराने पिण्याच्या पाण्याची सोय केली होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे सर्व अधिकारी कर्मचारी क्रीडा भारती पदाधिकारी कार्यकर्ते आणि विविध योगा संस्था यांनी अथक परिश्रम घेतले.



# शिरूर शहरातील आरोग्य शिबिरात दिडशे महिलांची एच.बी तपासणी

मानूर (प्रतिनिधी)

शिरूर शहरातील महिलांसह व बचत गटाच्या सर्व महिलांची आरोग्य शिबिरात मोफत हिमोग्लोबिनची तपासणी करण्यात आली.या शिबिराचे उद्घाटन सिद्धेश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांच्या हस्ते झाले.या वेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून नगराध्यक्षा सौ.प्रतिभाताई रोहिदास पाटील गाडेकर यांची तर विशेष उपस्थिती म्हणून पोलीस निरीक्षक गणेश धोक्रट यांच्यासह उपनगराध्यक्षा श्वेता देसरडा, वैद्यकीय अधिकारी डॉ.पूजा म्हस्के,डॉ.राहुल खेडकर,डॉ.मृणाली घुगे,डॉ.अर्चना देशपांडे,डॉ.सुषमा सानप,डॉ.प्रिती बडे,डॉ.संध्या लाटे,डॉ. सपना शेळके,माजी नगराध्यक्षा मिरा गाडेकर यांची उपस्थिती होती.या आरोग्य तपासणी शिबिरात शहरातील जवळपास दिडशे महिलांची रक्त तपासणी करण्यात आली.या वेळी बांधकाम सभापती मोहिनी भालेराव,महिला व बालकल्याण समिती सभापती वैजयंता तळेकर,स्वच्छता व पाणीपुरवठा सभापती सुनीता रणखांब,माजी नगरसेविका सुचेता गाडेकर,आशा शिंदे यांची उपस्थिती होती.सदरील आरोग्य तपासणी शिबिर यशस्वी करण्यासाठी सुमन खामकर,वैद्यकीय कर्मचारी,अंगणवाडी सेविका,आशा वर्कर,कार्यक्रमाच्या आयोजक अश्विनी गणेश भांडेकर यांच्यासह राजमाता जिजाऊ महिला मंडळ,आमदार सुरेश धस मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# जालन्याचा नियोजनबद्ध विकास अन् सामान्य माणसांच्या हितासाठी माझे काम - पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे

## ४११ कोटी १७ लाख रुपयांच्या प्रारूप आराखड्यास मंजूरी जिल्हा नियोजन समितीची बैठक खेळीमेळीत






जालना (प्रतिनिधी)

आगामी काळात जिल्हयाचा नियोजनबद्ध विकास आणि सामान्य माणसांच्या हितासाठी नियमाच्या चौकटीत राहून आपले काम असणार आहे. या भागात उद्योग, व्यवसाय वाढावा यासाठी आपण सर्व लोकप्रतिनिधींसह प्रयत्नशील असणार आहोत, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केले. जिल्हा नियोजन समितीच्या त्यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या बैठकीत ४११ कोटी १७ लाख रूपयांच्या प्रारूप आराखड्यास मंजूरी देण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आज पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीला आ. बबनराव लोणीकर, आ. अर्जुन खोतकर, आ. संतोष दानवे, आ. हिकमत उढाण, आ. राजेश राठोड, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बसंल, जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल सुर्यवंशी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.यावेळी पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, सन २०२५-२६ साठी जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत शासनाने ठरवून दिलेली वित्तीय मर्यादा रु.३३२ कोटी २० लाखाची असून, जिल्ह्यातील विविध विकासकामांसाठी रु.२६७ कोटी ८० लाख वाढीव निधीसह जिल्हास्तरीय समितीसमोर सादर करण्याकरीता एकूण रु.६०० कोटी रुपयांचा प्रारुप आराखड्यास मंजूरी देण्यात आली आहे. सन २०२४-२५ साठी जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी क्षेत्र बाह्य घटक कार्यक्रम) अंतर्गत एकूण रु.४६९ कोटी १३ लाख तरतूद अर्थसंकल्पित झाली असून, बीडीएसवर रु.२६० कोटी ३३ लाख तरतुद प्राप्त आहे. तसेच सन २०२४-२५ साठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसधारण, अनुसूचित जाती घटक कार्यक्रम व आदिवासी क्षेत्र बाह्य घटक कार्यक्रम) अंतर्गत रु.३४१ कोटी ४३ लाख रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता झालेल्या असून, प्राप्त निधी पैकी रु.१४४ कोटी ४८ लाखांचा निधी वितरीत झाला असुन, रु.१२२ कोटी ०७ लाख निधी यंत्रणांनी आहरीत केला आहे. सन २०२४-२५ मधील मंजूर निधीतून जनतेला अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी वीज, पाणी, आरोग्य, रस्ते वाहतूक, कृषि विषयक सेवा आदींबाबत योग्य नियोजन करून प्रस्ताव सादर करुन सदर निधी विकासकामांवर वेळेत खर्च करावा. प्रस्ताव तयार करतांना स्थानिक गरजा, कामांची निकड, प्राथमिकता व लोकप्रतिनिधींची मागणी विचारात घेवून विकासकामे करावी, असे निर्देशही पालकमंत्री मुंडे यांनी दिले. यावेळी अवैध वाळू उपसा, अतिक्रमण, घरकुलांना वाळुची उपलब्धता, पाटांची दुरुस्ती, जलजीवन मिशनची कामे यावर चर्चा झाली.

# सत्संगतीने सन्मार्गावर आढळ राहिल्याने सर्वोच्च ध्येय साध्य होते - श्री ह.भ.प.त्र्यंबक महाराज मातकर

बीड (प्रतिनिधी)

मनुष्य जन्म सर्वोच्च ध्येय प्राप्तीसाठी आहे.सत्संगतीने सन्मार्गावर आढळ राहिल्याने कोणतेही कठीण असे ध्येय साध्य होते, असे प्रतिपादन बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येळंबघाटचे उपप्राचार्य श्री ह.भ.प.त्र्यंबक महाराज मातकर यांनी केले. ते वाढवाणा ता.जि.बीड येथील अखंड हरिनाम सप्ताहातील कीर्तन सेवेत बोलत होते.बंकटस्वामी संस्थानचे महंत श्री ह.भ.प.पू. गुरुवर्य लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली येथे गेल्या ३७ वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे.जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या ,म्हणवोनी शरण जावे । सर्व भावे देवाशी ।। तोहा उतरील पार ।भव दुस्तर नदीचा ।। या अभंगावर अतिशय विस्तृत चिंतन केले. अनेक जन्मानंतर अनमोल मनुष्य देह आपणास प्राप्त झाला आहे. याच देहाने कोणतेही सामाजिक, सांसारिक, परमार्थिक सर्वोच्च ध्येय आपणास प्राप्त करता येते. जन्म,मृत्यू ,जरा ,व्याधी यासारखे दुःख कायमस्वरूपी नाहीसे करण्यासाठी मनुष्यजन्म हे साधन प्राप्त झाले आहे. हे दुःख भगवंतास शरण गेल्यानेच नाहीसे होऊ शकते. आपण सर्व भावांनी युक्त भगवंत शरणांगती पत्करल्यास तो कठीण अशा भवसागरातून आपणास पैल तीराला घेऊन जातो. अनंत नावाने विभूषित असलेला भगवंत अतिशय करुणावंत आहे. व्यसनांपासून दूर राहून आपण सन्मार्गावर आढळ राहिल्यास आपले जीवन सुखी होते.असे चिंतन त्यांनी केले.यावेळी कीर्तन साथसंगतीसाठी गायनाचार्य बंडू महाराज जटाळ ,बिबीशन महाराज कोकाटे ,हरिभाऊ महाराज काळे , सुंदर महाराज खैरे,संजय महाराज काशिद, घोलप महाराज , गावातील भजनी मंडळ तसेच श्री संत भीम सिंह महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी व मृदंग साथीसाठी आप्पासाहेब महाराज कोटुळे यांची साथ होती.यावेळी कीर्तनासाठी समस्त वाढवाणा गावकरी मंडळी, महिला, तरुण मंडळी व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.





लातूर - जिल्ह्याचे पालकमंत्री छत्रपती श्रीमंत शिवेंद्रराजे भोसले यांचे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई जिल्हा शाखा लातूरच्या वतीने स्वागत करताना प्रदेश उपाध्यक्ष तथा लातूर जिल्हाध्यक्ष अशोक देडे व जिल्हा कार्याध्यक्ष अफसर कारभारी.

# अवैध वाळूचा व्यवसाय करणाऱ्या तब्बल ५१ जणांना पोलीस अधीक्षकांचा दणका

बीड /प्रतिनिधी

वाळुचा व्यवसाय करणाऱ्या ५१ इसमांना पोलीस अधीक्षक,बीड यांनी अवैध वाळु वाहतुक करणार नाही याबाबत सक्त सुचना देवुन २६ इसमांवर केली प्रतिबंधक कारवाई केली. या दणकेबाज कारवाईने अवैध वाळू व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

दिनांक ०१/०२/२०२५ रोजी नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक,बीड यांनी जिल्हयातील अवैध वाळु उपसा करुन चोरटी विक्री करणारे अभिलेखावरील ५१ इसमांना पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड येथे बोलावुन त्यांना योग्य मार्गदर्शन केले. तसेच कोणीही यापुढे अवैधरित्या वाळुची तस्करी, चोरटी वाहतूक करणार नाही, तसे आढळुन आल्यास त्यांचे विरुध्द हद्दपार, चझऊ-, मोक्का कायद्या अंतर्गत कारवाई केली जाईल याबाबत सुचना दिल्या आहे. तसेच यातील २६ इसमांविरुध्द अभिलेख पाहणी करुन प्रतिबंधक कारवाई केली असून २६ इसमांनी बाँडचे उल्लंघन केल्यास त्यांचे बाँन्डची रक्कम शासन जमा करण्याची कारवाई केली जाईल याबाबत सक्त सुचना देण्यात आलेल्या आहेत.

# दोन कार अपघातात तीन जण जागीच ठार

बीड /प्रतिनिधी

अंबाजोगाई-केज मार्गावरील चंदनसावरगाव जवळ शुक्रवारी (दि. ३१) रात्री १०.४५ च्या सुमारास दोन कारचा भीषण अपघात झाला. या अपघातात तिघांचा मृत्यू झाला असून, एक जण गंभीर जखमी आहे.

मृतांमध्ये अमित दिलीपराव कोमटवार (३५, रा. दिंद्रुड, ता. माजलगाव), परमेश्वर नवनाथ काळे (रा. खांडे पारगाव, बीड) आणि गणपत नारायण गोरे (४७, रा. सामनापूर, बीड) यांचा समावेश आहे.अपघातग्रस्त कार क्रमांक (एमएच-२३/ई ६८५२) आणि (एमएच-१२/एमडब्ल्यू-३५६३) या दोन वाहनात भीषण अपघात वाहनचालकांचे नियंत्रण सुटल्याने समोरासमोर जोराची धडक झाली. अपघाताचा आवाज ऐकून स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. परमेश्वर काळे यांचा अपघाताचा आवाज एकून स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. परमेश्वर काळे यांचा जागीच मृत्यू झाला. तर अमित कोमटवार आणि गणपत नारायण गोरे गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे अंमलदार शेंडगे, पठाण आणि वारे यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परमेश्वर काळे यांचा मृतदेह ताब्यात घेऊन केज येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवला. गंभीर जखमी अमित कोमटवार आणि गणपत गोरे यांना तातडीने अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या भीषण अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



# वडवणी बालविकासचे कर्मचारी सुरेश दिवटे यांना सेवापूर्तीनिमित्त निरोप

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी येथील एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयाचे कर्मचारी सुरेश आश्रुबा दिवटे हे नियत वयोमानानुसार दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी आपल्या प्रदिर्घ शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या या सेवापूर्तीनिमित्त त्यांना हृदयपूर्वक निरोप देण्यात आला. यानिमित्त वडवणीत सेवापूर्ती सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# बीड तालुक्यात एनडीआरएफ पथकामार्फत बिंदुसरा तलावात प्रशिक्षण व जनजागृती

बीड (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील पाली जवळील बिंदुसरा तलावात एनडीआरएफ च्या १६ जणांच्या पथकामार्फत शुक्रवार दि ३१ जानेवारी रोजी शालेय विद्यार्थी , नागरिक यांना नैसर्गिक आपत्तीत कशाप्रकारे स्वतःचा बचाव करावा , इतरांस सहाय्य करावे याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी विविध शासकीय अधिकारी , कर्मचारी , पोलीस विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिलेल्या माहितीनुसार,किशोर जाधव यांच्या नेतृत्वाखाली राजू प्रसाद , गवळी संतोष,संतोष शिंदे , दानवे अनिल,पाटील अनिल, मोरे किशोर राम, पवार विशाल,खवारे किरण,जायभाय शिवम,नीता कुंडेकर, बागुल विनेश,मोरे अमोल, गायकवाड सुनील, सय्यद मुनीर,भालेराव गणेश या एनडीआरएफ टीम मधील अधिकारी व कर्मचारी यांनी मौजे पाली येथील बिंदुसरा डॅम येथे प्रात्यक्षिक करून दिले.राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या पुढाकारातून जिल्हाभर नागरिकांना , विद्यार्थ्यांना शासकीय अधिकारी , कर्मचाऱ्यांना नैसर्गिक आपत्तीचे वेळी कशाप्रकारे आपत्तीग्रस्तांना मदत करावी स्वतःच्या जीवाची काळजी घेत इतरांना कशी मदत करावी याबाबतचे प्रशिक्षण देण्याची योजना विचाराधीन होती.

निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी जिल्ह्यातील बिंदुसरासारखी धरणे तलाव याची माहिती घेतली. त्यानुसार एनडीआरएफची टीम सर्वत्र जाऊन जनतेला व शासकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे कार्यक्रम राबवित आहे. बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या माध्यमातून बीड , गेवराई व शिरूर तालुक्यात अशी प्रशिक्षणे आयोजित करण्यात



आलेली आहेत.पावसाळ्यात अनेक ठिकाणी धो धो पाऊस बरसतो . यामुळं संपूर्ण जनजीवन विस्कळीत होत . अशा वेळी पूरस्थितीतून नागरिकांची सुटका करण्यासाठी प्रथम धावून येतं ते एन डी आर एफ च पथक . भूकंप , महापूर , त्सुनामी , चक्रीवादळ आणि इतर नैसर्गिक आपत्तीवेळी एन डी आर एफ दलाला पाचारण केलं जात. एन डी आर एफ ( नॅशनल डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स ) म्हणजेचं राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल.

बिंदुसरा जलाशयात शुक्रवारी एनडीआरएफच्या पथकाने विविध प्रात्यक्षिके करून दाखविली . शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . यावेळी शितल चाटे मंडळ अधिकारी विभाग पाली , अनिल गायकवाड ग्राम महसूल अधिकारी पाली , जितेंद्र शेळके ग्राम महसूल अधिकारी आहेरवडगाव , संदीप नवले सरपंच पाली ,मीरा नवले सामाजिक कार्यकर्त्या, रमण नवले पाली सर्कल प्रमुख,मनीषा मुंडे शिक्षिका जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाली , आनंद मस्के ग्रामीण पोलीस स्टेशनचे कर्मचारी , योगेश निर्धार पोलीस कर्मचारी हे उपस्थित होते.कोणत्याही नैसर्गिक आपत्तीच्या वेळी जिल्हा प्रशासन व तालुका प्रशासन सज्ज आहे . अशा वेळी नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाशी संपर्क साधावा असे आवाहन बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले आहे.

# इन्फ्राच्या मुख्य अभियंता, अधीक्षक व कार्यकारी अभियंता यांचे गाव फिडर कामाकडे अक्षम्य दुर्लक्ष - आमदार बबनराव लोणीकर

जालना (प्रतिनिधी)

गाव फिटर योजनेअंतर्गत जालना जिल्ह्यामध्ये केंद्र सरकारच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा केली जात आहे.परंतु ज्या एजन्सीला हे काम देण्यात येतात आले आहे त्या एजन्सीने सदरील काम दुसऱ्या एजन्सीकडे सबलेट केले आहे आणि त्या एजन्सीने देखील सदरील काम पुन्हा एकदा तिसरी एजन्सीला सबलेट करून दिले आहे अशा परिस्थितीत प्रत्येकाने आपला वाटा काढून घेतला व काम पुढच्या एजन्सीकडे दिले त्यामुळे अत्यंत दर्जाहीन स्वरूपाचे काम केल्यामुळे वित्तहानी होण्याची अत्याधिक शक्यता आहे. त्यामुळे अशा बोगस काम करणाऱ्या व स्वतः काम न करता इतरांना कामसबलेट करून देणाऱ्या सर्व एजन्सीवर कठोर कारवाई करत त्यांना काळ्या यादीत टाकण्यात यावे व बोगस काम केल्याप्रकरणी त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात यावा.सदरील काम करणारी विश्वनाथ नावाची ही मातब्बर कंपनी असून त्यामुळे इन्फ्राचे मुख्य अभियंता अधीक्षक अभियंता कार्यकारी अभियंता हे सदरील कंपनीवर कारवाई करण्यास घाबरतात व कंपनीने केलेल्या बोगस कामाकडे दुर्लक्ष करतात अशा कंपनीवर व दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. अशी मागणी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर




यांनी आज केली.

जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीदरम्यान आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर आमदार हिकमत उढान आमदार संतोष दानवे आमदार राजेश राठोड जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षा मीना यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने ही गाव फुले योजना संपूर्ण जिल्हा भारत राबवली जात असून यामुळे गावठाण साठी वेगळी वीज वितरण व्यवस्था तर शेतीसाठी वेगळी वीज वितरण व्यवस्था केली जाणार आहे स्वातंत्र्याच्या ७० वर्षापासून गंजलेले आणि मोडकळीस आलेले विजेचे खांब आणि तारा बदलण्याचे काम या माध्यमातून केले जाणार आहेत

सिंचन विहीर व घरकुल योजना ही अत्यंत गोरगरीब लोकांसाठी सुरू करण्यात आलेल्या योजना असून सिंचन विहिरीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सक्षम करणे तर प्रधानमंत्री आवास योजना रमाई आवास योजना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अहिल्याबाई होळकर घरकुल योजना शबरी आवास योजना या योजनांच्या माध्यमातून गोरगरिबांना पक्की घरे उपलब्ध करून देण्याची योजना केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून सुरू आहे परंतु शासकीय व प्रशासकीय पातळीवर काही अधिकारी मंजुरी देण्याच्या नावाखाली आर्थिक व्यवहार करून गोरगरिबांची लूट करत असल्याची बाब आमदार बबनराव लोणीकर यांनी पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या निदर्शनास आणून दिली. या मागणीला सर्वच आमदारांनी दु जोरा दिला परिणामी अशी मागणी करणाऱ्या व गोरगरिबांना लुटणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांची कुठलीही गळ केली जाणार नाही असेही पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी आमदार बबनराव लोणीकरांच्या सूचनेवर उत्तर देताना सांगितले.




# सखुबाई दिगंबर कस्बे यांना लोकसहभागातून मिळालं हक्काचं घर,

## डोळ्यातून आले आनंदाश्रू.मान्यवरांच्या हस्ते फित कापून झाला गृह प्रवेश

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

शहरातील समतानगर भागातील सखुबाई दिगंबर कस्बे नाल्याच्या बाजुस मातीच्या भेंड्या पासुन बनवण्यात आलेल्या विटा पासुन लहाने घर होते,मात्र ते पावसामुळे भिजून गेल्यामुळे पूर्ण भिंत ओली असल्यामुळे पडझड झाली होती पूर्ण पत्रे गळके होते पावसाळ्यात नाल्याला पाणी आले की पूर्ण घाण पाणी घरात शिरले जातात आणि राहण्यास शिल्लक जागाच नसत , पावसाळ्यामध्ये सखुबाई शेजाऱ्या बाजारी घराच्या बाहेर आसरा घेत असे. कोणी आसरा देत तर कोणी देत नसे. सखुबाईला मुलगा मुलगी होती मात्र त्यांचे निधन झाले, तसेच पतीचेही तीन-चार वर्षांपूर्वी निधन झाल्यामुळे सखुबाई वर दुःखाचा डोंगर कोसळला कारण पाहणारे कोणीही नाही. खंडीभर नातेवाईक आहे पण कोण पाहणार मानवलोक कडून गेल्या आठ वर्षापासून किराणा सामान दिल जाते त्याच्यावरच आपले गुजरान करत असे, निराधारचे अनुदान मिळत आहे त्यामधून औषध गोळ्या पाणी व इतर खर्च करत. सखुबाईला वाटू लागली की खायला आहे, मात्र राहण्यास घर नाही त्यामुळे सखुबाई पावसाळ्यात सैरावैरा पळत असे. मानवलोक संस्थेकडे संपर्क केला आणि म्हणाल्या की, एक-दोन पत्राचं घर द्या एवढाच आशेचा किरण आहे.

आणि असे ठरवले की आपण लोक सहभागातून एक लहानसा घर देता येईल का त्यामुळे अनेकांशी चर्चा केली आणि एक लहानस घर बांधून देण्याचे ठरले अनेकांनी यासाठी अर्थसहाय्य केले, अनेकांनी विटा, पत्रे, सिमेंट, घराचे खिडकी, डस्ट , मुरूम, अशा प्रकारे सहाय्य केले आणि एक छानसे टुमदार घर बांधून देण्यात आले. सखुबाईच्या घरी अनेक मान्यवर आले आणि सखुबाईनी डोळयातील आनंदाश्रूला वाट मोकळी करून दिली, त्या म्हणाले की मी आजवर कोठे आडोसा घेऊन रात्र काढत असे मला जवळ कोणीही केले नाही पण आज घर झाल्यामुळे अनेक नातेवाईक अस्थिवाइकपणे विचारत आहेत. घर झाल्यामुळे आता मला कुठे जायचे गरज नाही ऊन पाऊस वारा आला तरी मला काहीतरी नाही. या लोकार्पण सोहळ्यासाठी, नंदकिशोर मुंदडा, मानवलोकचे अनिकेत लोहिया, डॉ, संदीप थोरात, डॉ, हर्षमाला काळे, संतोष लोमटे, स्वेक्षा लोहिया, सचीन डोंगरे, सुभाष ताटे, संजय साळवे, नरसिंग साबणे, दादासाहेब कस्बे, परमेश्वर गीते, बबन मारवाड,अनिल बनसोडे, संतोष चव्हाण, बालाजी शेरेकर आदी उपस्थित होते.

# सर्व घटकांना न्याय देणारा परिपूर्ण अर्थसंकल्प

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील नवीन भारताचा नवा नकाशा ना. पंकजाताई मुंडे यांनी केले केंद्रीय अर्थसंकल्पाचे स्वागत



मुंबई (प्रतिनिधी)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात देशातील शेतकरी, शेतमजूर, तरूण वर्ग, महिला अशा सर्व समावेशक घटकांचा विचार करण्यात आला आहे. हा अर्थसंकल्प सर्व सामान्य घटकांना न्याय देणारा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील नवीन भारताचा नवा नकाशा समोर ठेवणारा आहे अशी शब्दांत राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहे.

अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेची घोषणा करण्यात आली आहे.सरकार ही योजना राज्यांसोबत चालवणार आहे. १.७ कोटी शेतकऱ्यांना मदत मिळणार आहे. याचा देशातील १०० जिल्ह्यांना फायदा होणार आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना ५ लाख रुपयांचे पॅकेज, किसान क्रेडिट कार्डच्या कर्जाची मर्यादा आता ३ लाखांवरून ५ लाख रूपये करण्यात आली आहे. किसान क्रेडिट कार्ड द्वारे ७ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना सुलभ कर्ज सुविधा मिळणार आहे. सर्व जिल्हयामध्ये जिल्हा रूग्णालयात कॅन्सर डे केअर सेंटर, ३६ जीवरक्षक औषधी करमुक्त, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय यासाठी पाच लाख रुपयांपर्यंत कर्ज आदींसाठी यात तरतूद करण्यात आली आहे.अर्थसंकल्पात नव्या करप्रणालीची घोषणा करण्यात आली आहे.त्यानुसार १२ लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त होणार आहे. त्याचसोबत पुढील सर्व टॅक्स स्लॅब्जमध्येही बदल केले असून त्यानुसार करदात्यांना भराव्या लागणाऱ्या करात सूट मिळाली आहे. त्यामुळे करदात्यांसाठी हा अर्थसंकल्प मोठा दिलासा देणारा आहे. या अर्थसंकल्पामुळे सामान्य माणसाची खर्च करण्याची क्षमता वाढेल. देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास दर वाढवणे, सर्वसमावेशक विकास सुनिश्चित करताना खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक वाढवणे, देशांतर्गत भावना उंचावणे आणि वाढत्या मध्यमवर्गाची खर्च क्षमता वाढवणे या अर्थसंकल्पाचे उद्दिष्ट असल्याचे ना. पंकजाताई यांनी सांगितले.

